रविवार, 20 नोव्हेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१००
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 20 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-100 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# विद्यापीठाने मूल्यांच्या विकासावरही भर द्यावा

## कुलपती भगत सिंह कोश्यारी : नितीन गडकरी, शरद पवार यांना डी.लिट पदवी प्रदान



### समृद्ध-संपन्न समाज निर्मितीसाठी विद्यापीठांची भूमिका महत्वाची : नितीन गडकरी

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले, प्रगतीशिल, समृद्ध व संपन्न समाजाच्या निर्मितीसाठी विद्यापीठांची भूमिका महत्वाची आहे. शैक्षणिक क्षेत्रात गुणात्मक परिवर्तन व त्या भागातील सर्वांगिण विकासासाठी विद्यापीठाचे योगदान महत्वाचे आहे. प्रगतीशील मराठवाड्यासाठी विद्यापीठाची भूमिका महत्वाची ठरणार असून शैक्षणिक क्षेत्रासोबतच विकासाची दिशा भविष्यातील पिढीला देणारे केंद्र विद्यापीठ असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यापीठ हे एक ज्ञानशक्ती केंद्र आहे. विद्यापीठाने त्या भागातील विविध क्षेत्रातील संशोधनातही अग्रेसर असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात चांगली प्रगती होत आहे. विद्यापीठाने शैक्षणिक गुणवत्तेसोबत विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा तसेच मुल्यांच्या विकासावरही भर देणे गरजेचे आहे. नव्या शैक्षणिक धोरणात सर्वच बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विज्ञानासोबतच संगीत शिकण्याची संधी देखील उपलब्ध झाली आहे. स्नातकांनी महापुरूषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी यांनी शनिवारी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 62 व्या दीक्षांत समारंभाप्रसंगी राज्यपाल बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खा. शरद पवार, पद्मभुषण डॉ.विजय भटकर, कुलगुरू डॉ.प्रमोद येवले आदी उपस्थित होते.**

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, युवकांनी आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी तसेच देश विश्वगुरू होण्यासाठी योगदान द्यावे. देश जागतिक पातळीवर प्रगतीकडे झेप घेत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीबाबत जाणून घेण्यासाठी राज्यातील अनेक कुलगुरू इतर देशात तसेच इतर देशातील कुलगुरू आपल्या राज्यात आले आहेत. या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातील विचारांची देवाण घेवाण होण्यास मदत झाली आहे. स्नातकांनी आपले ध्येय सुनिश्चित करुन ध्येय पूर्ण करण्यासाठी सातत्याने काम करावे. राष्ट्रसेवेचा संकल्प करावा व समाज परिवर्तनासाठी पुढे यावे, असे आवाहन राज्यपाल कोश्यारी यांनी केले. पद्मभूषण डॉ.विजय भटकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण अत्यंत महत्वाचे ठरणार आहे. यामध्ये उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेतून देण्याबाबत अंतर्भाव करण्यात आला आहे. विद्यापीठ, शाळा, शैक्षणिक पद्धती अत्यंत महत्वाची आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात कल आहे. देशाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असून यामुळेच भारत जगातील आर्थिकदृष्ट्या सक्षम राष्ट्र म्हणून पुढे येईल. यावेळी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी व खा. शरद पवार यांना डी.लिट पदवी प्रदान करण्यात आली.



### शैक्षणिक क्षेत्रासोबतच मराठवाड्यातील शेतीक्षेत्रही बदलू लागले : शरद पवार

ज्येष्ठ नेते खा. शरद पवार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातही औरंगाबाद पुढे येत आहे. नवीन पिढीला आंतरराष्ट्रीय पातळीवर दालने खुले करुन देण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. शैक्षणिक क्षेत्रासोबतच मराठवाड्यातील शेतीक्षेत्रही बदलू लागले आहे. मराठवाड्यात वाढू लागलेल्या ऊस शेतीला चालना देण्याचा आपला प्रयत्न आहे. वसंतराव नाईक शुगर इन्स्टिट्युटच्या माध्यमातून जालना येथे शेती, उद्योग व तंत्रज्ञान क्षेत्रात संधी देणारी संस्था लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

# ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर कृषिपंपाची वीज सतत खंडित; शेतकरी संकटात!

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुलसिंग राजपूत**

**सोयगाव :** परतीच्या पावसामुळे शेतपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांचा खरिप हंगाम पाण्यात गेला, आता रब्बी हंगामात मोठी आशा होती. मात्र, महावितरणच्या सुलतानी धोरणांमुळे शेतकऱ्यांचा रब्बी हंगामही धोक्यात जाण्याची शक्यता आहे. ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर कृषीपंपाचा वीज पुरवठा सतत खंडीत होत असल्याने मोलखेडा येथील शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढावले आहे.

सोयगाव तालुक्यातील मोलखेडा, हिवरी, घाणेगाव तांडा, नादांतांडा परिसरात खरीप हंगामा पाठोपाठ रब्बी हंगामही सावळदबारा महावितरणकडून केल्या जाणाऱ्या कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे संकटात सापडला आहे. विहिरीत पाणी असूनही विजेच्या लपंडावाने पिकांना देता येत नसल्याने नैसर्गिक आपत्तीनंतर ३३ के.व्ही. उपकेंद्र महावितरण सावळदबारा निर्मित आपत्ती शेतकऱ्यांवर ओढावली असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



गेल्या वर्षी उन्हाळ हंगामात पाणी पातळी घटल्याने पिके जळून गेली होती. त्यानंतर गेल्या खरीप हंगामात पिके काढणीस आली आसतानाच अतिवृष्टीने ती वाहून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला. त्यानंतर रब्बी हंगाम उभा करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागली. रब्बी पिकांची कशीबशी लागवड केली मात्र ढगाळ हवामानामुळे कीटकनाशकांची फवारणी करीत कशबशी पिके जगविण्याचा अटापिटा सध्या सुरू आहे. त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे.मोठ्या प्रयत्नाने वातावरणावर मात करीत शेतकरी पिकांचे स्वास्थ्य टिकविण्याचा प्रयत्न करीत असले तरी सावळदबारा महावितरणच्या लहरी वीज पुरवठ्यामुळे पिकांची धूळधाण होऊ पाहत आहे.

शेतीसाठी दिला जाणारा वीजपुरवठा तीन टप्प्यांत असला तरी दोन टप्पे ऐन थंडीच्या वेळेतच आहेत . एक टप्पा दिवसाचा असला तरी वेळोवेळी वीज खंडित होत असल्याने पिकांचे भरणे होत नाही . त्यामुळे यंदा मुबलक पाणी उपलब्ध असूनही विजेच्या लहरीपणाचा फटका शेती पिकांना बसत आहे .

**– रवींद्र गायकवाड ,शेतकरी**

शेतकऱ्यांवर आलेल्या या अतिवृष्टीने खरिप हंगाम गेला, आता सावळदबारा महावितरणमुळे रब्बी हंगाम धोक्यात आलाय . गहू, हरभरा कसा पेरायचा ? कुटुंब जगवायचं कसं ? लेकराबाळांचं पोट कसं भरायचं ? की आत्महत्या करायची ? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी सरकारला केलाय .

**– जेष्ठ नागरिक रामभाऊ वारांगणे**

शेतीसाठी यंदा मुबलक पाणी आहे . गेल्या दोन हंगामांत शेतकऱ्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटलेली आहे . चांगले पाणी उपलब्ध झाल्याने या रब्बी हंगामात गेल्या दोन हंगामांत झालेल्या नुकसानीची कसर भरुन काढता येईल आशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती . मात्र विजेचे भारनियमन व सातत्याने शेतीसाठी मिळणाऱ्या वेळेतील विजेचा लपंडाव यामुळे शेती पिकांचे भरणेच होत नसल्याने पिकांना मोठा फटका बसत आहे . त्यामुळे महावितरण कंपनीने वीज पुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना आधार द्यावा .

**– अतुल इंगळे , मोलखेडा, ता . सोयगाव**

# शर्मिला येवलेसह ३६ पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** युवती सेनेच्या सहसचिव शर्मिला येवले यांच्यासह ३६ युवती पदाधिकाऱ्यांनी अंतर्गत राजकारणामुळे आम्ही राजीनामा देत असल्याचे पत्रकार परिषद घेत जाहीर केले आहे. मात्र, आम्ही पक्षाचे कार्यकर्ती म्हणून काम करीत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. एकाच वेळी युवती सेनेकडून राजीनामा देत असल्याचे जाहीर केले असल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या राजीनाम्याबाबत शर्मिला येवले म्हणाल्या की, मागील दोन वर्षांपासून शिवसेनेच्या युवती राज्यभरात अनेक आंदोलन, निवडणुकांमध्ये काम करीत आहे. मात्र प्रत्येक वेळी युवती सेने मधील वरीष्ठ पदाधिकाऱ्यांकडून आम्हाला चांगल्या प्रकारे वागणूक दिली गेली नाही. आंदोलन घेतले तर प्रसार माध्यमांशी का प्रतिक्रिया दिली. माध्यमांशी संवाद साधू नका अस अनेक वेळा सांगण्यात आले. आपला पक्ष, आपली काम याच माध्यमामधून नागरिकांपर्यन्त पोहोचू शकतो. हे बाब वरीष्ठना सांगून देखील सतत आम्हाला कोणतीही भूमिका मांडू दिली गेली. त्यामुळे आम्ही अखेर सर्व ३६ युवती पदाधिकारी राजीनामे देत आहोत. मात्र, आम्ही कार्यकर्ती म्हणून काम करत राहणार आहे. आम्ही कोणत्याही इतर पक्षात जाणार नाही. या सर्व घडामोडी घडत असताना आमच्या कामाच आदित्य ठाकरे आणि वरुण सरदेसाई यांनी कौतुक देखील केले. पण वरिष्ठांकडून चूकीची वागणूक देत असल्याने पदाचा राजीनामा देत असल्याचे सांगितले.

# संत ज्ञानेश्वरांच्या जन्मभूमीत साकारतोय भावंडांचा जीवनपट

## आपेगाव : ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या प्रयत्नांनातून मुख्य मंदिर परिसराचा विकास


आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

पैठण : संत ज्ञानेश्वरादी चारी भावंडाचे जन्मस्थान आसलेल्या आपेगावी प्राधिकरणाच्या माध्यमातून विकासकामे रखडले असले तरीही देणगीदात्याच्या माध्यमातून व संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या अथक प्रयत्नांनातून मुख्य मंदिर व तेथील परिसराचा विकास गतीने चालू आहे. जन्मगावी उभारलेल्या भव्य दगडी हेमाडपंथी मंदिराच्या बाजूलाच आता धारिवाल कुटुंबाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या चारी भांवडाचे जीवनपट उत्थित शिल्पाच्या माध्यमातून साकारल्या जात आहे .

त्यामुळे ईथे येणाऱ्या वारकरी भाविकांच्या पर्यटनात नक्कीच भर पडणार आसल्याचे कार्तिक काला संत ज्ञानेश्वराच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या आधी या शिल्प भाविकांसाठी खुले होणार असल्याची माहिती संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज यांनी दिली.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# फिटे अंधाराचे जाळे



अपंगत्व आलेले असते. ते त्या मुलांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करीत नाहीत असे नाही. पण शेवटी ते हताश होतात, प्रयत्न सोडून देतात. दुसऱ्या अपत्यासाठी प्रयत्न करतात. ज्या मुलांना दुर्दैवाने वल्लरीच्या मात्यापित्यांसारखे आईवडील लाभत नाहीत, त्यांची अवस्था फार वाईट होते. अशा कळ्या बहुधा फुलण्याआधीच गळून पडतात. अशा मुलांच्या पालकांसाठी या पुस्तकात पावलापावलावर मार्गदर्शन आहे. वल्लरीच्या प्रगतीतले सगळे टप्पे, सगळ्या अडचणी भाऊंनी काळजीपूर्वक नोंदवून ठेवून सगळ्यांसाठी एक या पुस्तकाद्वारे एक मोलाचे मार्गदर्शन केले आहे. ही अथक जिद्दीची कहाणी आहे. भाऊ आणि सौ विद्याताई, वल्लरीची आत्या आणि स्वतः वल्लरी यांच्याबद्दल ऐकून भल्याभल्यानी तोंडात बोटे घातली. त्यांच्या अथक प्रयत्नांना सलाम केला. वल्लरीला भेटायला तर सुधीर फडके, श्रीधर फडके सांगलीला गेल्यावर आवर्जून जात असत. प्रख्यात गायिका आशा भोसलेंनी सुद्धा वल्लरीचे कौतुक केले. तरुण भारतचे माजी संपादक आणि व्यासंगी लेखक चं प भिशीकर वेळ मिळाला की तिच्या भेटीसाठी येत असत. तिला पत्र पाठवीत असत. आज भाऊ आणि विद्याताईंना लोक वल्लरीचे आईवडील म्हणून ओळखतात. यातच त्यांच्या प्रयत्नांचे यश आहे. वल्लरीच्या जीवनकथेने प्रेरित होऊन नीलकांती पाटेकर यांनी ' लाईफ इज ब्युटीफुल ' ही २४ मिनिटांची इंग्रजी शॉर्टफिल्म बनवली. ही फिल्म पाहून मुंबई दूरदर्शनचे मुकेश शर्मा यांना ' प्रेरणा पुरस्काराची ' कल्पना सुचली. पहिल्या प्रेरणा पुरस्काराचे मानकरी ठरले वल्लरी आणि तिची आई. मेहता पब्लिकेशन फाउंडेशन तर्फे तिला ' जिद्द ' पुरस्कार देण्यात आला. एप्रिल २००५ मध्ये वल्लरीला ' नवरत्न ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. असे अनेक मानसन्मान वल्लरी आणि करमरकर कुटुंबियांच्या वाट्याला आले. प्रश्न असा पडतो की त्यासाठी कौतुक कोणाचे करायचे, श्रेय कोणाला द्यायचे ? वल्लरी, भाऊ, विद्याताई की तिची आत्या ? हे श्रेय या सर्वांचेच आहे. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## प्रत्येक आर्थिक गुंतवणूक भावनिकतेतून नसावी

आधुनिक केसरी

दैनंदिन खर्चात मोठ्या रक्कमेच्या खर्चासाठी आपल्याला सतत पैसे लागत नाहीत मात्र छोट्या रक्कमेच्या वस्तूंची खरेदी मात्र वरचेवर आपल्याकडून सारखीच होत असते. आणि यातच आपल्याजवळील पैसे किती आणि कसे संपले याचा ताळमेळच काहीवेळा जमत नाही. त्यामुळे एकवेळ मोठ्या खर्चासाठी फार मागेपुढे पाहण्याची गरज नाही परंतु छोट्या खर्चांवर मात्र काटेकोरपणे लक्ष ठेवणं तसेच असे खर्च आपल्या मर्यादेत आणि नियंत्रणात ठेवणं केवळ आवश्यकच ठरतं असं नाही तर बचतीच्या दृष्टिकोनातून फायदेशीर ठरतं. आपल्या घरातल्या लहान मुलांना एक, दोन, पाच रुपयांची नाणी त्यांच्या घरेलू बँकेत ठेवण्यासाठी द्या. आपल्यापेक्षा हि लहान मुलेच बचतीचे काम नेटानं करतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

थेंबे-थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एक एक रुपयांच्या बचतीतून त्यांच्याच भावी आयुष्यासाठी लाखो रुपयांची बचत होऊ शकते. अनेक प्रकारच्या बिलांची रक्कम आगाऊ भरल्यास अथवा इंटरनेटद्वारे भरल्यास मिळणारी सूट एकप्रकारे काही प्रमाणात आपली बचतच करत असते. प्रत्येक महिन्याची हि एकूण रक्कम अगदी शंभर रुपये असली तरीही वर्षभराची याद्वारे होणाऱ्या आपल्या बचतीची रक्कम एक हजार दोनशेहून अधिक असणार आहे. आपल्या पैशाच्या गुंतवणुकीला भावनांची जोड असते. आपल्या भाव-भावना, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, चांगले-वाईट अनुभव या सर्वच गोष्टींचा संबंध आपल्या पैशाच्या गुंतवणुकीशी असतो. त्यामुळे आपण करत असलेली “गुंतवणूक भावनांची असते आणि आनंद कोट्यावधींचा असायला लागतो”. या आनंदाची अनुभूती अनुभवण्यासाठी निश्चितच काही विशेष खबरदारी घ्यावी लागते. काहीवेळा आपल्या गुंतवणुकीचा विषय भावनेचा असल्यामुळे आपण निर्णय देखील भावनेच्या आहारी जाऊन घेतो. आणि तो भावूकतेत घेतलेला निर्णय आपल्या भवितव्यावरच घाला घालतो.



**भवसिंधु पार | कर्म करी ||**

देहाचे चोचले | यातना कारक ||
देहाला घातक | ठरताती ||१||
इंद्रियांच्या गळा | वासनेचा फास ||
नेतो नरकास | ओढोनिया ||२||
विवेकाच्या अंगी | नांदते विरक्ती ||
देहाची आसक्ती | क्षीण होय ||३||
आप-पर भाव | लुप्त ज्याचा झाला ||
त्याच्या इंद्रियाला | बाधा कैसी ||४||
निस्संग मनाचा | सत्संग आचार ||
भवसिंधु पार | कर्म करी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरूपण”

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## अंबानामवंदना

अंबा शांभवी माधवी। राधा वैष्णवी वासवी।
सती कमला शामला। बाला बगला अर्गला।
रमा पार्वती भारती। उमा गायत्री सावित्री।
स्वाहा जगन्नायिका। हास वंदितो रेणुका।।

# || नाम घेण्याचा निश्चय करावा ||



आधुनिक केसरी

जे दृश्य असते ते आज ना उद्या नाश पावते. दृश्य हे स्वतंत्र नसते. भगवंताच्या अधीन असते. म्हणून, जगात जी जी गोष्ट घडते ती ती भगवंताच्या इच्छेनेच घडते हे आपण ओळखावे. आपला देह दृश्यच आहे, आणि त्याला चालविणारा भगवंत देहात आहे; त्याच्या अनुसंधानात राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे अनुसंधान राहणे भगवंताच्या नामाने साधते, म्हणून तुम्ही सर्वांनी नाम घेण्याचा निश्चय करावा. आपले चित्त नामामध्ये गुंतले म्हणजे देहाला प्रारब्धाच्या स्वाधीन करता येते. ही युक्ति ज्याला साधली त्याला सुखदुःखाची बाधा उरली नाही. संतांना देखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुखदुःख होत नाही. व्यवहाराच्या मार्गाने जात असता भगवंताचे नाम कधी विसरू नये. आपल्या प्रयत्नाला जे फळ येईल ती भगवंताची इच्छा समजून, जे पदरात पडेल त्यात समाधान मानावे. आपण प्रपंची लोक आहोत, म्हणून प्रपंचाला उचित असणारा प्रयत्न केल्यावाचून कधी राहू नये. पण प्रपंच हेच आपले सर्वस्व आहे हे न समजता, त्यामध्ये भगवंताला विसरू नये. परमार्थाला सदाचरणाची फार जरूरी आहे. उगीच भलत्याच्या सांगण्याला भुलू नये, आणि अनीति-अधर्माच्या मार्गाला जाऊ नये. संत जे सांगतात त्याच्यावर विश्वास ठेवून, मुखात नाम ठेवावे आणि सदाचरणाने वागून प्रपंच करावा. असे जो वागेल त्याचे कल्याण राम खात्रीने करील हे मी सर्वांना वचन देतो. बहुतेकांना प्रपंचासाठी देव पाहिजे असतो. खरोखर, हे सर्व हिंग-जिऱ्याचेच गिऱ्हाईक आहेत; देवासाठी देव पाहिजे असे म्हणणारा खरा कस्तुरीचा चाहताच कोणी भेटत नाही.
जो बरा होणार नाही अशा रोग्याला बरा करतो तो डॉक्टर खरा. अगदी विषयातल्या माणसांनासुद्धा जो बाहेर काढतो तो संत खरा. त्याच्याजवळ जाऊन नुसते 'मी शरण आलो आहे' असे म्हटले तरी पुरे होते. हल्लीच्या आणि पूर्वीच्या प्रपंचात तसा फरक नाही; पण पूर्वी लोक देवाला विसरत नसत, अलिकडे ते जास्त संकुचित झाले आहेत. पूर्वी खेडेगावामध्ये स्वाभाविकपणे एकमेकांच्या उपयोगी पडावे अशी बुद्धी असायची, पण आता काळ पालटला आहे. तुम्हा इतक्या लोकांना नामस्मरण करताना पाहून मला एक समाधान वाटते की, मला जी गोष्ट आवडते ती इतक्या लोकांना आवडू लागली आहे. मी सांगितलेले तेवढे करीन असा निश्चय करा. कशाचीही काळजी करू नका. मी तुमचा भार घेतलेला आहे ही जाणीव ठेवून आनंदाने प्रपंच करा.
आजचे बोधवचन आहे

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

**मना अल्प संकल्प तो ही नसावा।**
**सदा सत्य संकल्प चित्ती वसावा।**
**जनी जल्प विकल्प तो ही तजावा।**
**रमाकांत येकांतकाळी भजावा।।१३०।।**

**श्लोकार्थ :** हे मना, संकुचित स्वरूपाचा संकल्प करू नकोस. नेहमी विशाल, उदार आणि ब्रम्हाचा संकल्प करीत जा. समाजात उगाचच वादविवाद, शंका घेणे टाळावे आणि एकांतात भगवंताचे नामस्मरण करावे.

**विवेचन :** मनुष्याच्या मनात सतत विचारचक्र चालू असते. ते विचार कधी चांगले तर कधी अत्यंत वाईट असतात. मनुष्य जात्याच स्खलनशील असल्यामुळे मनुष्याच्या मनात नकारात्मक विचारांचे प्राबल्य जास्त असते. नकारात्मक विचार मनात ठाण मांडून बसतात. त्यामुळे सकारात्मक विचार करा, असे मनुष्याला वारंवार सांगावे लागते. अर्थात, चांगला विचार मनात येणे, तो टिकणे, रुजणे तसे कष्टाचेच. बघा ना ! मद्य प्राशन कसे करावे ?, यासाठी कोणतीही शाळा नाही, तरीही आपल्याकडे मद्याची निर्मिती सर्वात जास्त आणि मद्याच्या विक्रीत दरवर्षी विक्रमी वाढ होत आहे. समाजपुरुषाचा विचार केला तर हे घातक आहे, नाही का गोपालक श्रीकृष्णाच्या देशात खरेतर दुधाचा महापूर असायला हवा, परंतु सध्याचा दारूचा आणि व्यसनाधीनतेचा महापूर आला आहे असे खेदाने नमूद करावेसे वाटते.
जग म्हटलं की त्यात घडामोडी घडणार...., कधी पंच महाभूते तांडव करणार, तर कधी राजकीय उलथापालथ होणार... कधी मनुष्याला प्रापंचिक अडचणी येणार तर कधी सामाजिक, कधी व्याधी होणार तर कधी अन्य काही...... त्यातील कोणत्या गोष्टीला किती प्राधान्य द्यायचे हे मनुष्याने विवेकाने ठरवायला हवे. अनेक गोष्टींशी आपल्याशी थेट संबंध नसतो, अनेक गोष्टी आपण दुर्लक्षित करू शकतो, जे शक्य आहे, ते मनुष्याने अवश्य करावे. आपली वृत्ती बिघडणार नाही इतकेच लक्ष मनुष्याने अशा घडामोडीत घालावे, म्हणून श्रीसमर्थ म्हणतात, "जनी जल्प विकल्प तो ही तजावा". मनुष्याने कोणताही विकल्प मनी न धरता सत्य संकल्प अर्थात भगवंत प्राप्तीचा संकल्प करावा.
मनुष्य चांगला संकल्प कशाला म्हणतो ? तर आपली भौतिक प्रगती व्हावी, मूलबाळ, मुबलक संपत्ती, घरदार, नोकर-चाकर, मानमरातब अशा सर्व गोष्टी सहज प्राप्त व्हाव्या असे मनुष्याला वाटते. हे पूर्णपणे चुकीचे आहे, असे म्हणता येणार नाही, पण यातून भौतिक गोष्टीतून मिळणारा सुख टिकणारे नाही हे सुध्दा मनुष्याने लक्षात घ्यायला हवे. तात्कालीक सुखापेक्षा चिरंतन टिकणारे समाधान जास्त मोलाचे नव्हे काय ? समर्थ सत्य संकल्पा विषयी म्हणतात, "सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐशिया द्वैताचा जल्प । मनचि करी ॥" (दा. ०७.०५.०४)
भगवंताचे चिंतन करायला एकांत चांगला कारण तिथे आपला आपल्याशी संवाद होतो. Two is company, Three is croud. अशी एक इंग्रजी म्हण आहे. एक भगवंत आणि एक आपण असा उत्तम संवाद होऊ शकतो. याची अंतिम पायरी म्हणजे एकाचाही अंत होणे. अर्थात परमेश्वर आणि मी एकच आहोत याची अनुभूती येणे. जेव्हा आपण एकांतात असतो तेव्हा सुद्धा आपण एकटे नसतो. आपले मन ( गीतेत भगवंतांनी मी मन आहे असे म्हटले आहे ) आपल्या सोबत असते, तेव्हा त्याच्याशी उत्तम रीतीने संवाद होऊ शकतो. मनुष्याला 'एकटेपणा'पेक्षा 'एकाकीपणा'ची जास्त भीती वाटते. ज्याला एकाकीपणाची भीती वाटते त्याने 'एकटे' पडण्यापूर्वी भगवतांशी मैत्री करावी, असे सर्व संत सांगतात. * घरात भरपुर माणसे असल्याने एकांत मिळत नाही अशी सबब सांगणारे, तसेच जेव्हा घरातील सर्वजण बाहेर गेले म्हणून ज्याला घर खायला उठते, त्याने एकांत स्थळी न जाता, घरात राहूनच एकांताचा अभ्यास करावा. त्यांनी नेमके आणि मोजके बोलावे. मनुष्य घरात एकटा असताना नक्की काय करतो यावे त्याची अध्यात्मिक प्रगती किती झाली आहे हे त्याला तपासून पाहता येऊ शकते.

# बँका विकासाच्या रक्तवाहिन्या : भागिनाथ मगर

## तलवाडा येथे आर्थिक साक्षरता व वित्तीय समावेशनासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा अभिनव उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील तलवाडा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने संपूर्ण वित्तीय समावेशन अंतर्गत मेळावा आयोजित करण्यात आला होता. बँका या विकासाच्या रक्तवा हिन्याआहेत. छोटे-मोठे व्यवसाय व्यापारी उद्योजक यांच्यासाठी बँकांची भूमिका महत्त्वाचे असून बॅकेची विश्वास सार्था महत्वाची असल्याचे मत कु.ऊ. बा समिती सभापती भागिनाथ मगर यांनी व्यक्त केले.

भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने तलवाडा गावात संपूर्ण वित्तीय समावेशन अंतर्गत मेळावा आयोजित करण्यात आला.गावातील ज्या व्यक्तींचे बँकेत खाते नाही, त्यांनी खाते उघडणे, खाते असणारी व्यक्तिने KYC पूर्तता करणे, मोबाईल नंबर जोडला नसल्यास तो खात्यास जोडणे या बाबत मेळाव्यात मार्गदर्शन करण्यात येणाराआहेत. त्यात



अधिकारी मनिष वानखेडे प्रदीप दांडगे, सादीक शेख निलेश जगधने यांनी जनधन खाते उघडणे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना. अटल पेन्शन योजना यासह विविध विषयांवर बँकेची सविस्तर माहिती देऊन ठेवी व त्यावरील आकर्षक व्याजदर तसेच कर्ज प्रकरणाविषयी माहिती देऊन गावातील प्रतेक नागरीकाचे बॅक खाते गावातच उघडले जातील असे सांगितले. यावेळी भागिनाथ मगर दादाभाऊ मगर द्तु मगर विनोद मगर, शांताराम मगर, आशिप शेख.वामन लहाराव पवार काकासाहेब मगर रहिखा पढाण पापा शेख गोकुळ मगर, राजेंद्र खरात, प्रकाश सोनवणे, राजेंद्र मगर ज्ञानेश्वर मगर. यांची प्रमुख उपस्थितीथी होती. पुढे बोलताना भागिनाथ मगर म्हणाले महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील आधिकरी चांगली सेवा देत आहेत परंतु जनधन खाती उघडण्याचे काम बँक कर्मचाऱ्यांनी केले. त्यांना रूपे कार्ड देणे, आधार लिंकअप करण्याचा संपूर्ण भार असून त्यात भरीसभर मुद्रा लोन, विमा काढण्याची जबाबदारीसुद्धा बँक कर्मचारी निभावत आहेत.त्या तुलनेत पुरेसे मनुष्यबळ नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आणी खातेदार याच्या मधे खटके उडतात कर्जाच्या रूपाने अनेकांना आर्थिक बळ देणाऱ्या बँकेत सध्या मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे. कर्मचाऱ्यांअभावी उपलब्ध आधिकरी यांचा कामाचा ताण वाढला असून बँकेतील 'आरामदायी' नोकरीचे स्वरूप आता 'त्रासदायक' या वर्गवारीत मोडल्या जाऊ लागले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बँकांमध्ये खासगीकरणाचे वारे वाहत असताना कर्मचारी भरतीदेखील थांबलेली आहे. गेल्या काही वर्षांपासून नियमितपणे आणि गरजेनुरूप भरती प्रक्रिया झालेली नाही. त्याचा थेट परिणाम सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडत आल्याचे भागिनाथ मगर यांनी सांगितले.

यावेळेस गावातील सरपंच ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य चेअरमन गावातील नागरिक महिलाव्यापारी उद्योजक मोठ्यासंख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदिप दांडगे सूत्रसंचालन ग्रामसेवक आर.आर. पवार यांनी केलेले तर आभार शांताराम मगर यांनी आभार मानले.

# भारत जोडोसाठी फुलंब्रीतून 700 कार्यकर्ते जाणार : बोरसे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारत जोडो यात्रेत सहभागी होण्यासाठी फुलंब्री तालुक्यातील 100 वाहनांमधून 700 कार्यकर्ते शेगाव येथे शुक्रवारी जाणार आहेत अशी माहिती काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संदीप बोरसे यांनी दिली. फुलंब्री येथे बाजार समिती आवरण बुधवार काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बैठकीची आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुंडलिकराव जंगले, सुभाष गायकवाड, सुनीताबाई मार्कर, मुदत पाटील, ज्ञानेश्वर जाधव, बाबुराव ढकले, शिव विटेकर, शेख रज्जाक, प्रशांत नागरे, संतोष मेटे, अंबादास गायके, सुरेश मुळे, मंगेश मध्ये, आदिनाथ शेळके, नामदेव पायगव्हाण, अंकुश गायकवाड, गणेश चव्हाण, शिवाजी शेजुळ आदीची उपस्थिती होती.

# शिवसेनेच्या गंगापूर उपतालुकाप्रमुखपदी जैस्वाल

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** शिवसेना ( उद्धव ठाकरे गट ) नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. सभापती संजय जैस्वाल यांची गंगापूर उपतालुकाप्रमुखपदी निवड करण्यात आली. नगरसेवक भाग्येश गंगवाल यांची गंगापूर शहर प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे.



# फ. मु. शिंदे, डॉ. कोल्हे दांपत्य, संजय मोने, सुकन्या कुलकर्णी, कमलाबाई शिंदे रवींद्र साठे, श्रेया बुगडे यांना लोकशाहीर विठ्ठल उमप फाऊंडेशनचा पुरस्कार

## २६ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे पुरस्कार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर व फाउंडेशनचे २०२२ चे मृदगंध पुरस्काराची घोषणा फाऊंडेशन चे अध्यक्ष व प्रसिद्ध गायक नंदेश उमप यांनी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत केली. लोकशाहीर विठ्ठल उमप फाऊंडेशनचा मृदगंध जीवन गौरव पुरस्कार प्रसिद्ध कवी फ.मू. शिंदे यांना, सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे व पद्मश्री स्मिता कोल्हे यांना, अभिनय क्षेत्रातील पुरस्कार, प्रसिद्ध अभिनेते संजय मोने व अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी यांना, संगीत क्षेत्रातील पुरस्कार प्रसिद्ध पार्श्व गायक रवींद्र साठे यांना, लोककला क्षेत्रातील पुरस्कार श्रीमती कमलाबाई शिंदे यांना तर नवोन्मेष प्रतिभा पुरस्कार 'चला हवा येऊ द्या' फेम प्रसिद्ध अभिनेत्री श्रेया बुगडे यांना जाहीर करण्यात आला. मानपत्र, लोकशाहीर विठ्ठल उमप यांची प्रतिकृती असलेल्या स्मृतीचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दि. २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:३० वा. रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, मुंबईचे सह पोलीस आयुक्त डॉ. विश्वास नांगरे पाटील, आ. आशिष शेलार, ज्येष्ठ



दिग्दर्शक राज दत्त व संगीतकार अशोक पत्की यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त दिमागदार स्मृती संगीत सोहळ्याचे देखील आयोजन करण्यात आले आहे. त्यात सुप्रसिद्ध गायक पद्मभूषण उस्ताद रशीद खान यांचे गायन, कोकण कन्या यांचा फ्युजन बँड आणि शाहीर नंदेश उमप यांच्या लोकसंगीताचा शानदार कार्यक्रम होणार आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री डॉ. समीरा गुजर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहे.

पोवाडा, भारुड, भजन, गण, गवळण, लावणी, कवणे, तुंबडी, बोबडी, धनगरी गीते तसेच वासुदेव, गोंधळी, डोंबारी, नंदीवाला, पोतराज अशा अस्सल पारंपारिक मराठमोळ्या लोककला लोकशाहीर विठ्ठल उमप यांनी हयात भर लीलया सादर करून रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमानिमित्त त्यांच्या कलाकारकिर्दीस व स्मृतीस उजाळा मिळणार आहे.



# विश्व हिंदू परिषद, बजरंग दल फागणे येथे हितचिंतक अभियानाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** विश्व हिंदू परिषद हितचिंतक अभियान दर तीन वर्षांनी राबवण्यात येते.जेणेकरून हिंदू समाज एकत्र आला पाहिजे व हिंदू समाजाला नेहमी ऊर्जा मिळावी यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने हितचिंतक अभियान सुरू आहे. त्या अनुषंगाने धुळे तालुक्यातील फागणे गावात विश्व हिंदू परिषदेच्या वतीने यावर्षी हितचिंतक अभियान राबवण्यात आले. या अभियानाच्या सुरुवातीला प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्याच्यानंतर हिंदू जनजागृतीच्या घोषणाबाजी देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवण्यात आली. तदनंतर यावेळी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांची सभासद नोंदणी करण्यात आली. या अभियानाला प्रमुख पाहुणे म्हणून गणेश मोकाशी मुंबई क्षेत्र समरसता प्रमुख, ललितभैय्या चौधरी देवगिरी प्रांत सहमंत्री, विश्व हिंदू परिषद, योगीराज मराठे, धुळे जिल्हाध्यक्ष, विंहिप, ॲड. विशाल पिंपळे (विंहिप धुळे जिल्हामंत्री), अनिल मोरे बजरंग दल जिल्हा संयोजक,हेमंत कचवे बजरंग दल जिल्हा सहसंयोजक, समाधान पाटील, सुनील जाधव, रामेश्वर पाटील, उमेश पाटील, दिपक पाटील, लखन सोनार, किशोर पाटील, विक्की सौदाणे, छोटू बडगुजर, दीपक पाटील, जितेंद्र पाटील नामदेव पाटील व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.




आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# बेरजेचे राजकारण




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**व्यवस्था परिवर्तनाची लढाई लढत असताना सर्वांना सोबत घेऊन, विश्वासात घेऊन पुढे जाणे गरजेचे असते. जो नेता, पक्ष, विचारसरणी केवळ आपलेच खरे व बाकी सगळे झूट अशा अविर्भावात असतात अथवा गतकालीन गोडवे किंवा कटू अनुभव उगाळत बसतात आणि आपल्या धारणा घट्ट करून बसतात, त्यांना एकतर वर्तमानाची मागणी समजलेली नसते अथवा मोडेन पण वाकणार नाही, हे धोरण स्वीकारलेले असते. राजकारण हे विशिष्टांचे हितसंबंध साधण्यासाठी नसून समाजोन्नत्तीसाठी आहे, हे लक्षात घेतल्यास बरेचसे प्रश्न समजण्यास सोपे होतात.**

तुमचे व्यक्तिगत चारित्र्य, निष्कलंकता, प्रामाणिकता आणि विचारपद्धती तुम्हांस सार्वजनिक जीवनात तुमचे स्थान कसे असेल, हे ठरवते. अगदी ग्रामपंचायतपासून ते लोकसभा राजकारणापर्यंत सत्तास्पर्धा हे एकक यात कार्यरत असते. ही सत्ता मिळवताना फक्त विशिष्ट गटावर लक्ष द्यायचे आणि काहीकडे पूर्णतः दुर्लक्ष करायचे, असे होत असेल तर त्यास बेरजेचे राजकारण म्हणता येणार नाही. किंवा सत्ता एकहाती येऊ शकणार नाही याची पूर्णतः खात्री पटल्यानंतर केवळ हेकटपणे एकला चलो रे ही भूमिकाही योग्य नाही. कारण तुमच्या डोक्यातील समाजोन्नत्तीविषयक ज्या काही स्वप्नस्थ कल्पना असतील त्या सत्तेशिवाय कशा पूर्ण करता येणार? अशा वेळेस आपल्या विचारांना थोडीशी बगल देऊन समविचारी लोकांसोबत जर सर्वसाधारण कलमांना घेऊन एकत्र असू तर वावगे काही नाही. अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारचे किंवा महाराष्ट्रातील मविआ सरकारचे उदाहरण यासाठी आपल्या समोर आहे. कधी कधी परस्परविरोधी विचारसरणी असणारे गट एकत्र येऊन समाजासाठी विघातक असणाऱ्या विचारांना दूर ठेवण्याचे कार्य करतात. सामान्य माणसास हे थोडे विचित्र वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही, पण काळाची पावले ओळखून असे करणे क्रमप्राप्तच असते. काही मंडळी सुशिक्षितांचे राजकारण आणि अशिक्षित-अर्धशिक्षितांचे राजकारण वेगळे अशा स्वरूपाची मांडणी करतात. पण राजकारण हे राजकारणच असते. त्याची वर्गवारी कशीही केली तरी आपल्या हाती फार काही लागत नाही. सत्तास्पर्धा ही एकमेव गोष्ट दोन्हीठिकाणी महत्त्वाची असते. ग्रामपंचायत आणि विद्यापीठीय राजकारण हे दोन घटक उदाहरणादाखल घेतल्यास यात असा कोणता वेगळेपणा जाणवतो. काही ठिकाणी पैशाचे प्रलोभन असते तर काही ठिकाणी पार्ट्या झोडण्याचे. एकुणात मतदारांना खुश करणे दोन्ही ठिकाणी सारखेच. आता विद्यापीठ निवडणुकीचे पडघम महाराष्ट्रातील विद्यापीठ परिक्षेत्रात वाजू लागले आहेत. वेगवेगळ्या प्राधिकरणावर निवडून जाण्यासाठी केवळ वैयक्तिक प्राध्यापकच नव्हे तर यात राजकीय पक्ष देखील डेरेदाखल झाले आहेत. प्राध्यापकांच्या प्रश्नांना घेऊन कोण व्यक्ती काम करतो हे त्या त्या विद्यापीठातील प्राध्यापकांना पुरतेपणी माहीत असते, परंतु ऐन मोक्याच्या वेळी पक्ष, जात, धर्म, आपला-परका असा भेद निर्माण होतो आणि जे खरोखरच काम करणारे असतात आणि सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची भाषा करतात, तेच नेमके या प्रक्रियेत मागे पडतात. ज्यांचा प्राध्यापकांच्या प्रश्नांचा अभ्यास नसतो, जे कोठेही गेले तरी जात सोबतच घेऊन फिरतात आणि इतरांना दूषणे देतात आणि फक्त निवडणूक काळातच उगवतात पण तरीही निवडून येतात. हे गमक कळण्यासाठी फार परिश्रम करण्याची आवश्यकता नाही. कारण त्यांचा बोलविता धनी वेगळाच असतो. मग प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या पदरी निराशा आली तर आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. सुशिक्षितांचे राजकारण संधीसाधुपणाचे असते. यश मिळाले तर माझ्यामुळेच आणि अपयशाचे खापर मात्र दुसऱ्याच्या डोक्यावर फोडून मोकळे. या निवडणूक प्रक्रियेत जसे वैयक्तिक, पक्षीय उमेदवार निवडणुकीला सामोरे जातात तसेच काही संघटना देखील यात उतरतात. संघटना म्हणजे नेहमीच समविचारी लोकांनी एकत्र येऊन तयार केलेला मंच असा अर्थ नेहमीसाठी लागू पडेलच



## क्षितिजापल्याड

असे नाही. तर या माध्यमातून वैयक्तिक तीव्र इच्छांची पूर्तता करता येऊ शकते, असेही अनेकांना वाटते. सर्वसाधारण विचारांपेक्षा आपलाच विचार महत्त्वाचा आणि तोच संघटनेचा विचार, ही अवस्था संघटना फुटीसाठी पुरेशी आहे. सत्ताधारी संघटनेतील एखाद्याला हाताशी धरून, काही प्रलोभन देऊन आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करणार. कारण तुमची फूट त्यांच्या पथ्यावर पडणारी असल्यामुळे हे सर्व करणे त्यांच्यासाठी आवश्यक होऊन बसते. तुम्हाला दिलेली महत्ता ही व्यक्तीगत तुम्हाला नसते तर तुमच्या संघटनेतील स्थानाला असते. त्यामुळे हुरळून न जाता कोणीही आपली जी कोणती संघटना अथवा पक्ष असेल त्याच ठिकाणी राहून राजकारण केले तर ते दीर्घकाळासाठी बेरजेचे राजकारण होईल. अन्यतः आपला हेतू साध्य झाल्यानंतर त्यांच्या लेखी आपण कस्पटासमान आहोत. सत्तेच्या वर्तुळात काही दिवस छान जातात, पण आपलाच परीघ आपण छेदल्यामुळे केंद्र हरवून बसण्याची वेळ आपल्यावर येते. अगदी राष्ट्रीय राजकारणापासून ते गल्लीपर्यंत पाहिले तरी, जी माणसे आपल्याच माणसांना मोक्याच्या वेळी सोडून गेली, त्यांना जनता माफ करत नाही हा इतिहास आहे. तुमचे संघटनेतील पदाधिकाऱ्यांसोबत जमत नसेल, तर तो वाद घरातच मिटवा, सर्वांना विश्वासात घ्या, आपले कोठे चुकत आहे का? याचेही आत्मपरीक्षण करा, पण प्रलोभनाला बळी पडू नका. बेरजेच्या राजकारणासाठी आपल्या वैयक्तिक विचारला मुरड घालायला प्रत्येकाने शिकले पाहिजे, हे शिकता येत नसेल तर आपल्याला राजकारण जमत नाही, असा त्याचा अर्थ होतो. स्थान कोणतेही असले तरी राजकारणाने माणूस पुढे जाण्याची, त्याचे प्रश्न निकाली काढण्याची प्रक्रिया राबवली पाहिजे. अन्यतः हा देश कोणत्याही गोष्टीचा आनंदोत्सव साजरा करून विसरून जातो. निवडणुका ह्या आधुनिक आनंदोत्सवच आहेत, असे मानायला काय हरकत आहे.

# महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह विधान करूच नये



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की कोणत्याही महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह विधान करूच नये.कारण यात राजकारण्यांचे राजकारण होते नक्की,परंतु सर्वसामान्यांच्या भावना दुखावतात.देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब राहुल गांधी यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्र्यपुर्वकाळ हा अत्यंत खडतर होता हे सर्वांनाच ठाऊक आहे.महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष,साधु-संत होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.**

राहुल गांधी यांनी लक्षात ठेवली पाहिजे की देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे.तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर 150 वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील देशभक्तांनाच ग्यात असावी.परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर चीखलफेक करने व आक्षेपार्ह विधान करणे बरोबर नाही असे मला वाटते आणि ही बाब राहुल गांधी यांना शोभा देत नाही.कारण राहुल गांधी हे राष्ट्रीय पक्षांचे जबाबदार नेते आहेत. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन 75 वर्षे जुनी आहे.या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी,थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे.तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर नावाने संबोधले जाते.राहुल गांधी यांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब राहुल गांधी यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे.त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते. यात जहालवादी,मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते.त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत 1947 लाख स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सुध्दा मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म 28 मे 1883 मध्ये झाला व त्याचा मृत्यू 26 फेब्रुवारी 1966 ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन 56 वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन 75 वर्षे झालीत मग आताच राहुल गांधींना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. राहुल गांधीं म्हणतात की माझ्याकडे सावरकरांचे पत्र आहे,जे त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांला लिहिले होते.त्यात त्यांनी इंग्रजांना सेवक होण्याची विनंती केली आहे.त्यांनी जे लिहिले तेच मी म्हटले आहे. माझ्यामते राहुल गांधींनी इंग्रजांवर ऐवढा विश्वास का ठेवावा? इंग्रज कोणाचेच झाले नाही ही बाब राहुल गांधी यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे राहुल गांधींनी सावरकरांवर राजकारण करण्यापेक्षा महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,चालु घडामोडी, महागडे शिक्षण,वाढते प्रदुषण अशा जनकल्याणाचे मुद्दे उचलून सरकारला धारेवर धरले पाहिजे.परंतु भुतकाळातील गोष्टी काढून महाराष्ट्रातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळु नये. कारण स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे.त्यामुळे राहुल गांधींनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. राहुल गांधींच्या भारत जोडतो यात्रेचे स्वागतच करतो.कारण यामुळे देशात चांगलाच संदेश जाईल. परंतु आपल्या पुर्वजांवर शिंतोडे उडविने बंद करावे. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा केला आहे ही बाब राहुल गांधी यांनी लक्षात ठेवली पाहिजे. त्यामुळे जुन्या गोष्टींवर मिठ न चोळता आता आपण देशासाठी व देशातील जनतेसाठी भविष्यात नवीन काय करू शकतो याचा विचार केला पाहिजे व आपली भारत जोडतो यात्रा सुरू ठेवली पाहिजे यातुन देशवासीयांना चांगलाच संदेश जाईल. कोणताही राजकीय पुढारी किंवा पक्ष असो त्यांनी आपल्या पुर्वजांबद्दलची टीकाटिप्पणी किंवा आक्षेपार्ह विधान करणे टाळलेच पाहिजे.कारण यामुळे लोकांचे मन दुखावु शकते.तुम्हाला राजकारणात काय करायचे आहे ते अवश्य करा परंतु यानंतर थोरमहात्मे, क्रांतिकारक,स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पक्षांनी व पुढाऱ्यांनी घ्यावी.सावरकरांनी काय केलं आणि काय केलं नाही हे पहाण्यापेक्षा आपण देशासाठी व देशवासीयांसाठी काय करू शकतो याकडे राहुल गांधींनी लक्ष देण्याची गरज आहे.राहुल गांधी यांच्या भारत जोडतो यात्रेला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

आधुनिक केसरी

## लय भारी सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

ह्या दिवसात रसरशीत मस्त मोठी पिवळी धमक लिंबं मिळतात.नेहमीप्रमाणे वर्षभर टिकणारं साधं ,उपवासाचे लोणचं करून ठेवतोच. पण झटपट होणारा चटकदार लिंबाचा चटका माझ्या मामेनणंद सौ सविता शरद देसाई हिने रेसिपी सांगितली मग करून बघितला घरात सगळ्यांना खुप आवडला . आजारी माणसाला तर तोंडाला चव आणणारा , लहान मोठ्या सगळ्यांनाच आवडणारा "लिंबाचा चटका " नक्की आवडेल करून बघा आणि कळवा नक्कीच.त्यासाठी लिहून घ्या साहित्य आणि कृती. **लिंबाचा चटका :**

**साहित्य :** दोन तीन लिंबं, अर्धा चमचा लोणच्याचा मसाला, अर्धा चमचा तिखट , थोडाआल्याचा किस , हिंग हळद, जिरे, मोहरी, मेथीदाणे, तेल फोडणीसाठी, एक ते दीड चमचा साखर अर्धा चमचा मीठ चवीनुसार प्रमाण कमी जास्त करा. अर्धा लिंबाचा रस......

### लिंबाचा चटका

कृती:: लिंबं स्वच्छ धुऊन,कोरडे करून घ्या. दोन लिंबाची सालकाढणीने लिंबाच्या वरची पिवळीसाल काढून घ्या . आतला पांढरा थर पण थोडा थोडा काढून टाका.आता त्याच्या फोडी करून बिया काढून टाकाव्यात. मिक्सरच्या भांड्यात घाला त्यात मीठ साखर चवीनुसार , आल्याचा कीस, लोणच्याचा मसाला, तिखट घालून बारीक फिरवून घ्या .हे मिश्रण बाऊलमधे काढून घ्या. त्यात लिंबाचा रस घालून मिश्रण एकसारखे हलवून घ्या. त्यावर हिंग जिरे मोहरी हळद मेथीदाणे घालून खमंग फोडणी करून घालावी.मिश्रण एकसारखे हलवून घ्या. भरपूर दिवस टिकते. तोंडाला चव येते. आंबट,गोड,तिखट चवीचा लिंबाचा चटका तयार. मग करून बघाच एकदा...



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गौरवशाली इतिहासाचे प्रदर्शन व्हावे



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुकताच शिंदे सरकारने प्रतापगडावर ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला होता व जिथे आज त्याची कबर आहे त्या ठिकाणी अफजल खान वधाचा देखावा उभारण्यात येईल अशा पद्धतीचे निर्देश पर्यटन सचिवांना दिले आहे. या निमित्ताने पर्यटनाला चालना मिळेल. लाईट आणि साऊंड शो सुद्धा तिथे झाला तर फारच उत्तम कार्य होईल. यानिमित्ताने पर्यटकांना शिवछत्रपतींचा इतिहास अधिक चांगल्या प्रकारे कळू शकेल. आपल्या गौरवशाली इतिहासाचे प्रदर्शन होणे हे अतिशय आवश्यक आहे. यातून नवीन पिढीला प्रेरणा मिळू शकेल. अफजल खान हा आदिलशाहीचा एक मातब्बर सरदार होता. तो धूर्त, कपटी व क्रूर सुद्धा होता. अनेक हिंदू राजांना त्याने कपटाने भेटीला बोलावून ठार मारलेले होते. अनेकांना त्यानी जेरबंद केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ यांना सुद्धा त्याने लढाईच्या दरम्यान एकटे पाडून शत्रूच्या हातून मरू दिले होते. त्यामुळे अफजलखानाचा इतिहास हा विश्वासघाताचा इतिहास होता. हा अतिशय आडदांड व बलाढ्य असा सरदार होता.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या कष्टाने ज्या हिंदवी स्वराज्याचे रोपटे लावले होते, ते रोपटे उपटून काढण्यासाठी, स्वराज्याच्या प्राणाला नख लावण्यासाठी हा अफजलखान स्वराज्यात दाखल झालेला होता. स्वराज्यात येताना सुद्धा त्याने पंढरपूरच्या विठोबाला अपवित्र केले, तुळजाभवानीची मूर्ती भग्न केली. ठीक ठिकाणी मिळेल तो प्रदेश लुटत अफजलखान छत्रपती शिवाजी महाराजांना पकडायला वाई येथे आला. छत्रपती शिवाजी महाराज त्यावेळेस प्रतापगडावर होते. खानाने शिवाजी महाराजांना आपल्या भेटीला येण्याचा निरोप पाठविला. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय चातुर्याने खानालाच गडावर बोलविले. भेटी दरम्यान राजांना मिठी मारत अफजलखानाने महाराजांच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला. त्यावेळेस छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय चलाखीने व चपळाईने आपल्या हातात लपवून ठेवलेले वाघनख खानाच्या पोटात खूपसले व त्याचा कोथळा बाहेर काढला. खान ठार झाला. महाराजांचे मावळे खानाच्या फौजेवर तुटून पडले. प्रचंड कत्तल करण्यात आली. आदिलशहाचा इतका मातब्बर सरदार शिवाजीराजे भोसले नावाच्या एका नवीन स्वराज्य उभारणाऱ्या राजाने मारला ही त्या काळातली फार मोठी गोष्ट होती. स्वराज्य संपवायला आलेला प्रत्येक व्यक्ती तो कितीही बलाढ्य असेल, क्रूर असेल, उलट्या काळजाचा असेल परंतु त्याचा कोथळा येथे काढला जाईल. ही भूमी छत्रपती शिवाजी महाराजांना निर्माण करणारी भूमी आहे. ही भूमी मावळ्यांना निर्माण करणारी भूमी आहे. स्वराज्यासाठी आपले प्राण अर्पण करणारे लोक या भूमीत निर्माण झालेले होते व त्यांच्यामुळेच आजचा दिवस आम्हाला दिसतो आहे. अशा पद्धतीचा इतिहास हा नवीन पिढीला समजावा यासाठी तेथे अफजलखान वधाचे स्मारक होणे हे आवश्यक आहे.

मागच्या पंचवीस वर्षांमध्ये प्रतापगडावर अफजलखानाचे वर्चस्व आहे की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. अफजलखानाच्या कबरीचे पण फार मोठे रूप तिथे उदयास आले होते. कबरीचे एका मोठ्या मजारीत रूपांतर झाले होते. 19 खोल्यांचे भव्य निवास तेथे उभे राहिले होते. प्रचंड प्रमाणावर अतिक्रमण व समाज विघातक तत्त्वांचा तिथे वावर वाढला होता. काँग्रेसच्या शासनाच्या काळामध्ये अफजलखानाचे उदात्तीकरण झाले हे सत्य नाकारता येत नाही. शिंदे फडणवीस सरकारच्या काळामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे उदात्तीकरण होत आहे हे पण सत्य कोणाला नाकारता येणार नाही. कोणतेही सरकार अफजलखानाच्या कबरी जवळचे हे अतिक्रमण पाडायला धजत नव्हते. कारण अफजलखानाच्या कबरीला हात लावणे म्हणजे मुसलमानांना नाराज करणे आहे अशा पद्धतीचा या सरकारचा समज होता. आश्चर्याची गोष्ट ही आहे की छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये सुद्धा मुसलमान होते. त्यांना नमाज पढण्याकरता, मशिदी बांधण्याकरता जागा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली होती. अनेक ठिकाणच्या दर्ग्यांना सरकारतर्फे मदत केली जात होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात राहणारे मुसलमान ही छत्रपती शिवाजी महाराजांची प्रजा होती व त्यांचा राजा म्हणजे राजा शिवाजी होते.अफजलखान हा विजापूरच्या आदिलशहाचा सरदार होता व तो स्वराज्यावर चालून आलेला होता. तो स्वराज्याचा शत्रू होता. म्हणजे तो महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व हिंदू आणि मुसलमान यांचाही शत्रूच होता. त्यामुळे अफजलखानाच्या कबरीवर बांधण्यात आलेली इमारत असेल किंवा इतर कुठलेही अतिक्रमण असेल ते पाडल्यामुळे महाराष्ट्रातला सर्वसामान्य मुसलमान नाराज कसा काय होईल? परंतु राजकारणासाठी या आधीच्या सरकारने त्याचा असा अर्थ काढलेला होता. शिवाजी महाराज हे काही केवळ मराठ्यांचे किंवा हिंदूंचे राजे नव्हते तर ते हिंदवी स्वराज्याचे राजे होते. त्यामुळे हिंदवी स्वराज्यात राहणारा प्रत्येक व्यक्ती ही त्यांची प्रजा होती. तो मुसलमान का असेना पण तो महाराजांची प्रजाच होती. परंतु राजकारणी लोक सोयीस्करपणे अफजलखानाचा



संबंध मुसलमानांशी जोडतात. अनेक गणपती मंडळात किंवा काही ठिकाणी "दहशतवाद असाच संपवावा लागतो" अशा शीर्षकाखाली अफजल खान वधाचे चित्र छापण्यात आले होते. त्यावेळेस सुद्धा सरकारने त्यावर बंदी घातली होती. अफजलखानाला मारताना छत्रपती शिवाजी महाराजांना दाखविण्यात आले तर मुसलमानांना वेदना होण्याचे काहीच कारण नाही. कारण त्यांचा अफजलखानाशी काहीही संबंध नाही. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. परंतु राजकारणी लोक जाणीवपूर्वक अफजल खान हा मुसलमान होता म्हणजे महाराष्ट्रातले सर्वच मुसलमानांचा या अफजलखानाशी संबंध आहे अशा पद्धतीचा देखावा निर्माण करतात. तो खरा आहे की खोटा हे मुस्लिम समाजाने आपल्या आचरणातून दाखवून द्यावे. परंतु ओवेसी सुद्धा संभाजीनगर च्या दौऱ्यामध्ये औरंगजेबाच्या कबरीवर गेले. परंतु आपण या गोष्टीला लक्षात घेतले पाहिजे की तो आदिलशहा असेल कुतूबशहा असेल, निजामशाह असेल किंवा औरंगजेब असेल हे लोक आपल्याला एतद्देशीय मानत नव्हते. ते स्वतःला तुर्क समजायचे हिंदुस्थानी मुसलमान नाही.आम्ही तुर्क आहोत म्हणजे येथील मुसलमानांपेक्षा श्रेष्ठ आहोत अशा पद्धतीची त्यांची भावना होती.त्यामुळे त्यांच्या कबरीवर जाऊन त्यांचे उदात्तीकरण करण्याचे ओवेसींना असो किंवा कुठल्याही राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना काहीही कारण नाही.

ज्या इतिहासातून समाजाला प्रेरणा मिळेल, भावी पिढ्यांना प्रेरणा मिळेल, त्यांच्यामध्ये शौर्य, देशभक्ती इत्यादी गुण निर्माण होतील अशा पद्धतीचा इतिहास सरकारने जाणीवपूर्वक वेगवेगळ्या ठिकाणी प्रदर्शित करणे गरजेचे आहे. अफजलखानाचा छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला वध ही इतिहास इतिहासातील एकमेवा द्वितीय घटना आहे. आणि म्हणून त्या घटनेचा देखावा प्रतापगडावर उभारण्याचे सरकारने निश्चित केले आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी इतिहासातील प्रमुख लढाया झालेल्या आहेत, मोठे विजय संपादन करण्यात आलेले आहे, ज्यामुळे इतिहासाला कलाटणी मिळाली अशा घटना घडलेल्या आहेत, ज्या ठिकाणी तानाजी मालुसरे यांनी आपला देह ठेवला असेल, ज्या ठिकाणी बाजीप्रभूंच्या बलिदानाने घोडखिंड पावनखिंड झालेली असेल, ज्या ठिकाणी शिवाजी महाराजांच्या वेषामध्ये असल्यामुळे शिवा काशिदला आपले प्राण अर्पण करावे लागले असेल,जेथे मुरारबाजीचे धड लढता लढता पडले असेल, जेथे शाहिस्तेखानाची बोटे कापले गेली असेल अशा सर्व ठिकाणी त्या प्रसंगाचे देखावे लाईट अँड साऊंड शो, संग्रहालय, चित्र प्रदर्शनी उभारल्या गेली पाहिजे.हे इतिहासाचे प्रकटीकरण आहे. यातून समाज प्रेरणा घेईल. देश प्रेरणा घेईल. भावी पिढ्या प्रेरणा घेतील असा विश्वास आहे.

# पालखेड येथील श्री पारेश्वर यात्रा



प्रा.डॉ. शिवप्रसाद घोडके
पालखेड

आधुनिक केसरी

**सालाबादप्रमाणे याही वर्षी पालखेड ता.वैजापूर येथे श्री .पारेश्वर यात्रेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. ही यात्रा प्रत्येक वर्षी कार्तिक आमावश्येला भरते. पराशर ऋषीचे चिरंजीव व्यास व व्यासांचे चिरंजीव शुक मुनी .असे महान पराशर ऋषी यांनी पालखेड येथे तपश्चर्या करून साक्षात भगवान शंकराला प्रसन्न करून घेतले होते. श्री.पराशर ऋषिंच्या नावावरून 'श्री पारेश्वर' असे नाव या क्षेत्राला प्राप्त झाले आहे .या ठिकाणी असलेले महादेवाचे शिवलिंग फार जुने असल्याचे इतिहास सांगीतला जातो . दहेगाव येथील संत जनार्दन स्वामी यांना साक्षात महादेवाने ,पार्वती व गणपतीसह नंदिवर बसून दर्शन दिले होते.**

परंतु संत जनार्दन स्वामी यांच्या असे लक्षात आले की हे महादेवाचे मंदिर खूप जीर्ण झालेले आहे. त्यांनी त्याच मंदिराच्या जागेवरच लोकांच्या श्रमदानातून नविन हेमाडपंथी मंदिर बांधले. त्या ठिकाणी नवीन शिवलिंग स्थापन करून इ.स.१९७८ ला श्री.पारेश्वर महादेव मंदिराचा जिर्णोद्धार केला .तसेच या ठिकाणी राम, लक्ष्मण,दर्शनासाठी येऊन गेल्याची अख्यायिकाही रामायणात सापडते. तसेच संत नामदेव महाराज यांनी लिहिलेल्या समाधी प्रकरणपर अभंगात ते म्हणतात. "पराशर ऋषिंचे स्थळ हे पुरातन | राहिले नारायण पंचरात्र ||." म्हणजे बाराव्या शतकात साक्षात पंढरीचा पाडुरंग, संत नामदेव महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज , संत चांगदेव ,संत मुक्ताबाई, संत चोखामेळा,संत सावता आदी संत तीर्थयात्रा करीत व चांगदेव महाराज यांना समाधीसाठी जागा पाहण्यासाठी पालखेड येथे आले होते व पाच दिवस मुक्कामीही राहिले होते. त्यावेळी या सर्व संतमंडळींनी मोठ्या श्रद्धेने श्री. पारेश्वर महाराजांचे दर्शन घेतले व पालखेड गावातून श्री. पारेश्वर महाराजांच्या पालखीची मिरवणूक काढून नगर प्रदक्षिणा मारली . ज्या खेड्यातून पालखी काढली ते खेडं म्हणजे (पालखी +खेडं) पालखेड असे नामकरण या पालखीमुळे पालखेड या गावाला प्राप्त झाले असावे . तेव्हापासून श्री. पारेश्वराची पालखी मिरवणूक काढण्याची परंपरा अखंडितपणे आजही चालू आहे .या यात्रेची काही वैशिष्ट्ये सांगायची ठरली तर पालखेड गावातून सासरी नांदायला गेलेल्या मुली दिवाळीच्या सणाला न येता दरवर्षी कार्तिकी यात्रेलाच येणे पसंत करतात. कारण खरा दिवाळीचा आनंद त्यांना पारेश्वर यात्रेमध्येच वाटतो. हा आनंद म्हणजे "तो सुख सोहळा काय वर्णू". यात्रा सात दिवस पुढे आहे तेच संपूर्ण मंदिराला रंगरगोटी करून लायटींगची रोशनाई लावली जाते. ज्ञानेश्वरी पारायण,हरीपाठ, आरती व सायंकाळी ह.भ.प .श्रीहरी महाराज वैष्णव धनगर प्रिंप्रि जालना यांच्या सुमधूर अमृतमय वाणीतून संगीत श्रीमद्‌भागवत कथेचे निरूपण सांगीतले जाते .त्याचप्रमाणे एकादशीच्या दिवशीपासून पुढे पाच दिवस नगरखान्यात चौघडा वाजवला जातो.पालखेड पासून एकविस किलोमीटर अंतरावर नागमठाण या गावाजवळून गोदावरी ही नदी वाहते. या नदीतील पवित्र तीर्थ आणण्यासाठी पालखेड येथून अनेक भाविक मुले पायी पायी जातात व भोपळ्यामध्ये तीर्थ घेऊन येतात. खरंतर इतक्या अंधाऱ्या रात्री हे गोदावरीचे तीर्थ घेऊन येणे फार मोठ्या कष्टाचे काम आहे .परंतु ' श्री.पारेश्वर महाराज की जय' अशा घोषणा देत देत हे भाविक अमावश्येच्या अंधाऱ्या रात्री मोठ्या कष्टाने सकाळपर्यंत पालखेड येथे पोहोचतात. हेच तीर्थ अमावश्येला निघणाऱ्या पारेश्वरांच्या पालखी मिरवणूकीबरोबर भोपळ्यात मिरवतात. मिरवणूकीनंतर तीर्थ पारेश्वर महादेवाच्या पिंडीवर मोठ्या श्रद्धेने वाहतात .या पालखी मिरवणूकीत श्री.पारेश्वर महाराजांच्या मुकूटाला फुलांनी सजवून पालखीची मिरवणूक काढली जाते. तसेच संत जनार्दन स्वामी महाराज यांची पालखीही या मिरवणुकीत असते. कलशधारी मुली ,टाळ मृदुंगाच्या जयघोषात भजन ,कावडी धरणारे भक्त,डफवाले,सहनाईवाले ,अशा संगीतमय व भक्तीमय वातावरणात वाजत ,गाजत ,नाचत,हजारो भाविक भक्त पारेश्वराच्या भक्तीत तल्लीन होऊन जातात व दर्शनासाठी गर्दी करतात. ही मिरवणूक जवळपास चार ते पाच तास चालते .विशेष म्हणजे पारेश्वरांला खव्याचे पेढे आणि साखरेचे काजू प्रसाद म्हणून वाटले जातात . अनेक भाविकांचे नवसही यावेळी फेडले जातात .नवसाला पावणारा श्री. पारेश्वर म्हणून या दैवताची दूरदूर ख्याती पसरलेली आहे.श्री. पारेश्वराला नारळ फोडण्याची प्रथा नसून संपूर्ण नारळच महादेवाच्या पिंडीवर



वाहण्याची प्रथा आहे .

अनेक भाविकांच्या घरी महाप्रसादाची व्यवस्था केलेली असते .त्यामुळे कावडी धरणारे भाविक , पाहुणे व गावकरी सर्वजन या महाप्रसादाचा लाभ घेतात.

त्याच दिवशी सायंकाळी पाच वाजता ह.भ.प.श्रीहरी महाराज यांच्या अमृतमय वाणीतून काल्याचे कीर्तन होते .यावेळी हजारो भाविक मोठ्या आनंदाने कीर्तन श्रवणाचा लाभ घेतात .कीर्तन संपताच दहीहंडी फोडली जाते.महाआरती होऊन काल्याचा प्रसाद वाटला जातो .

सायंकाळी पारेश्वर सांस्कृतिक मंच येथे तीन अंकी नाटकांचे आयोजन केलेले असते. या नाटकांचे विषय पौराणिक, धार्मिक ,ऐतिहासिक, सामाजिक,कौटुंबिक अशा स्वरूपाचे असतात."जय पारेश्वरा दिनदयाळा | करुणा सिंधू देवा ||हे साक्याचे बोल नाटकाच्या सुरुवातीला गायले जातात .तेव्हा खरंतर नाटक पाहण्यासाठी जागा कमी पडते . तीन ते चार हजार नाट्यरसिक नाटक पाहण्यासाठी येतात .दररोज एक नाटक याप्रमाणे चार ते पाच दिवस ही नाटके दाखवली जातात .गावातील नाटकांची ही परंपरा पण फार पूर्वीपासून चालत आलेली आहे असे सांगितले जाते . नाटकातील कलाकारही गावातीलच तरुण असतात . या वर्षी चार दिवस दररोज रात्री ८.०० वाजता तीन अंकी नाटकांचे सादरीकरण होणार आहे. त्यात दिनांक २३ डिसेंबर -' संगीत राक्षसी लालसा' २४ डिसेंबर 'जहरी प्याला' ,२५ डिसेंबर -' विसरली नाती कोरोनाने' २६ डिसेंबर' मॅट्रिक' .हे नाट्यप्रयोग दाखवले जाणार आहे. अलिकडे मोबाईल, टी.व्ही.यांसारखे प्रसार माध्यमे आली असली तरी पालखेड येथील नाटकं पाहण्यासाठी नाट्यरसिकांची उत्सुकता दरवर्षी अधिकच वाढताना दिसत आहे .

त्याचप्रमाणे कुस्त्या ,छंबिगोंडा,क्रिकेट यांसारख्या खेळांच्याही भव्य स्पर्धा येथे घेतल्या जातात व बक्षीस वितरण केले जाते . या यात्रा काळात कटलेरी सामान, हॉटेल्ससह अनेक दुकाना थाटल्या जातात. संपूर्ण यात्रेचा विचार करता येथे लाखो रूपयांची उलाढाल होते.

या यात्रेत व दर्शनासाठी जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे व श्री. भगवान पारेश्वरांचा आशीर्वाद प्राप्त करावा असे आवाहान श्री.पारेश्वर महादेव व विठ्ठल रुक्मिणीसह संतमेळा मंदिराचे मठाधिपती महंत महेंद्रगीरीजी महाराज व मंदिराचे विश्वस्त यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

# प्रेमाचा पुतळा नामदेव

आधुनिक केसरी

**नामदेवराय हे संतश्रेष्ठ श्री ज्ञानोबाराय यांच्या समकालीन संत ज्ञानाबोरायांचा सर्वात जास्त सहवास लाभला तो नामदेवरायांना असे म्हणावे लागले किंवा ज्ञानोबारायांच्या आद्य वा पहिले चरित्रकार म्हणजे श्री नामदेवरायच आहेत. नामदेवरायांच्या अभंगात माऊलींच्या समाधीचे व तसेच तीर्थाटनाचे अभंग आपण वाचलेच असतील असे नामदेव महाराज हे कवी, भक्त तत्वज्ञ आणि भक्तशिरोमणी आणि ज्यांनी मराठी भागवत वैष्णव धर्माची पताका पार पंजाबपर्यंत फडकवणारे व हिंदी भाषेतील ईशपर रचना आणि विशेष गौरवाची व अभिमानाची बाब म्हणजे महाराजांच्या ईशपर रचनांचा अंर्तभाव हा श्री गुरुग्रंथसाहेब या पवित्र ग्रंथात झाला. भक्तप्रल्हादां एवढे भगवंताचे लाडके भक्त म्हणजे श्री नामदेव महाराज आहेत असं वाटते.**

नामदेव या शब्दाचाच सरळ अर्थ असाच आहे नाम म्हणजे ईश्वराचे नाव नामस्मरण अर्थात नामस्मरणातच देव वा ईश्वर म्हणजे नामातच देव असा होतो. महाराज नामस्मरणाचे महत्व पटवून देताना वेदांचे वेदांचे तात्पर्य काय हे सांगतात म्हणतात

नामाविण वेद आणिक नाही

अजुन एका अभंगात नामस्मरणाचे महत्व प्रतिपादता

आकारला देव नामरूपा आला । म्हणूनी स्थापिला नामवेदी ।।

नामदेवमहाराजांनी त्यांच्या अभंगवाणीतून शैव व वैष्णव वादावर जबर प्रहार करत हरिहर ऐक्याचे जोरदार समर्थन केले जे आद्य शंकराचार्यांनी सुद्धा परब्रम्ह लिंगम् भजे पांडुरंग यातुन प्रतिपादित केले होतो. या वादा बद्दल थोर तत्वज्ञ श्री सोनोपंत दांडेकर मामा एके ठिकाणी म्हणतात शैव वैष्णव या देशविघातक वादास वारकरी संप्रदायाने तिलांजली दिली व या हरिहर ऐक्याचे जोरदार समर्थन केले . नामदेव महाराज हरिहर ऐक्याच्या संदर्भात म्हणतातः

*शिव विष्णु दोघे एकचि अवतार ।*
*वेदांनी निर्धार हाचि केला ।।*
*नाम म्हणे येथे दुजा नको भाव ।*
*विष्णु तोचि शिव शिव विष्णु ।।*

*पुढे या दोघांमध्ये भेद करणाऱ्याना नामदेवराय ठणकावून बजावता व म्हणतात*

*विष्णुसी भजला शिव दुरावला ।*
*अधःपात झाला तया नरा ।।*
*शिवपुजा करी विष्णुसी अव्हेरी ।*
*तयाचिये घरी यम नांदे ।।*

मराठी संतांचा हा समन्वयशील परिपेक्ष नामदेवांनी मांडला आहे. तसेच पुढे म्हणतात " नामा म्हणे शिव विष्णु मुर्ती एक. ज्ञानोबराय वा नामदेव महाराज ही दोन्ही संत कुल परंपरेने वैष्णव मात्र गुरु परंपरेने शैव असल्याने एवढा जबरदस्त समन्वय वारकरी संप्रदायाने प्रस्थापित केला असे म्हणावसे वाटते. पण या बरोबरच नामदेवराय हे पण सुचवतात वा ठासून सांगतात आपण म्हणजे भक्ताने आपल्या आरध्य दैवतेशी कसे एकनिष्ठ राहीले पाहिजे ते म्हणतात

*केशव आराध्य देवाचाही ही देव ।*
*पंढरीचा राव पांडुरंग।।*

*तसेच अजून एके ठिकाणी म्हणतात*

*सर्व देवांमाजी विठ्ठल वरिष्ठ ।*
*बोलतसे स्पष्ट वेदशास्त्री ।।*

याच बरोबर महाराज संतांचे महत्व ही त्यांच्या अभंगातून स्पष्ट करतात ते म्हणतात

*१) तपे व्रते दाने गोविंद पै भेटे ।*
*परि साधु तंव न भेटे भाग्येवीण ।।*
*२) संतापायी माथा धरिता सद्भावे ।*
*तेणे भेटे देव आपोआप ।।*

नामदेवरायांच्या गुरुपोदेशाची घटना आपणास सर्वास माहिती असणारच फार मोठी घटना आहे त्यावर लेखविस्तार भयास्तव लिहणे अशक्य आहे. श्री विसोबा खेचरांनी त्यांना "सर्वं खल्विदं ब्रम्हं " तसेच" वासुदेव सर्वं " असा उपदेश केला आहे.

ईश्वर सर्वत्र सम आहे हे भागवतधर्माचे वर्म विसोबा खेचरांनी नामदेवरायंना सांगितले यानंतर नामदेवराय म्हणतात

आम्हा सापडले वर्म । करु भागवतधर्म ।।

ज्ञानदेव व नामदेव

***ज्ञानोबाराय व नामदेव महाराजांची असामान्य जवळीक होती.ज्ञानोबारायांनी जो भक्तीमार्ग निवेदिला त्यास कीर्तनाच्या उत्कट भावनेने साकार केले ते नामदेवांनीच.***

***एके ठिकाणी महाराज ज्ञानोबारांयाविषय फार सुंदर व्यक्त होतात ज्ञानदेव ज्ञानसागरु । ज्ञानदेव ज्ञानगुरू ।***
***ज्ञानदेवभवसिंधु तारु । प्रत्यक्ष प्रत्यक्षरूपें असे ।।***

ज्ञानाबरायांनी मांडलेलं अमृताचं तत्वज्ञान नामदेवांनी त्यांच्या मधुरामधुर वाणीने सोपं करून सांगितले.

**नामदेवांचे तत्त्वज्ञान**


ज्ञानदेवांप्रमाणे नामदेव ही अद्वैत मानणारे होते.आद्य शंकराचार्यांच्या अद्वैतवादाचे वा ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्यावादाचे समर्थन त्यांनी केले आहे.

**महाराज एके ठिकाणी म्हणतात**

***हा जगडंबर पसरला पाल्हाळ ।***
***मायामय सकळ स्वप्न सर्व ।।***
***म्हणजे दिसणारे जग हे स्वप्नमय आहे सतत बदलणारे , नाश पावणारे चचल व फसवे आहे।***
***आकारले तितुके आहे नाशवंत.***
***अंतर्बाह्य एक ब्रम्हचि कोंदले***

परमात्म्यापेक्षा वेगळा असा विश्वाचा भास होणे म्हणजे माया होय. नेह नानास्ति किंचन ,एकं सत् हेच औषनिषदीय विचार नामदेवांनी मांडले.

***नामा म्हणजे विश्वंभरु आणिक ।***
***अंगुळ दशक आहे जे का ।***
***पुरुषसुक्तील अत्यतिष्ठत् दशांगुलम्***
***हा वैदीक सिद्धांत किती सोपा करून सांगितला.***
***वृत्ती सहीत मन पायिच ठेवावे । अद्वैत भोगावे प्रेमसुख ।***



मराठी संतांनी अद्वैतास द्वैताचे कोंदण घातले व द्वैताचे कोंदण अद्वैत तत्वाच्या मुशीत वितळविले आहे .

**उपसंहार**

वैष्णववीर नामदेवरायांचे कार्य एकुणच भागवतधर्माच्या विस्तारासाठी महत्वाचे आहे. साहित्यप्रकारच्या नव्या वाटा त्यांनी शोधल्या बहुकक्षी काव्य प्रतिभेच्या माध्यमातून ज्ञानदेवादि भावंडांची चरित्रे लिहले .

समकालीन संतांची व्यक्तीचित्रे रेखाटली. त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे तसेच कुट कविताही प्रसिद्ध आहेत. तीर्थावळी यातुन प्रवासवर्णनाची चाहुल लागते.

दशावतार, भीष्मप्रतिज्ञा , नक्रोदार अशी अख्यापर काव्य लिहुन ठेवली. भुपाळ्या आरत्या व भक्तीरचना सर्वश्रुत आहेतच. श्री गुरुग्रंथसाहेब मधील मुखबानी हे आंतभारतीचे सर्वप्रथम प्रसादचिन्ह आहे असे वाटते. वारकरी पंथाची ध्वजा सर्वप्रथम उत्तरेत नामदेवांची मिरविली. हिंदीतील भक्तीकाव्यास अध्यात्मिकविचाराचा उपन्यास सर्वप्रथम नामदेवांची दिला हे म्हणणे यथार्थ वाटते. नामदेवांनी विठोबाच्या भक्तीचा मार्ग पंजाबात जो आरंभला त्यातून पुढे रामानंद कबीर नानकदेवजी पीपा इ. संतांना प्रेरणा मिळाली. गुजरात म.प्रदेश पेशावर इ. भागात भागवत धर्माची पताका फडकवली. हीच विठ्ठल भक्तीची परंपरा द.भारतात विशेषतः कर्नाटकात अचलानंद विठ्ठल, रंग विठ्ठल, कनकदास, पुरंदर विठ्ठल ,सुंदर विठ्ठल , व्यंकटेश विठ्ठल इ. संतांनी भक्तीची गंगा दक्षिणेत प्रवाहीत केली.

पंजाबात घुमान येथे नामदेवांनी राधा कृष्णाचे मंदीर बांधले तसेच शिवाचे ही मंदिर आहे. पंजाब व राजस्थानात नामदेवांची मंदीरे आहेत. घुमान येथील मंदीर त्यांचे एकनिष्ठ शिष्य बहोरदास यांनी बांधले असे सांगण्यात येते. नामदेवांचा प्रभाव कबीर व इतर उत्तर भारतातील संतांवर झालेला दिसतो. त्यात नरसी मेहता रोहिदास त्रिलोचन सेना इ. नावे घेता येतील तर बोहोरदास आणि जल्लोसुतार हे पंढरीची यात्रा नेहमी करत असत तसे पंजाबमधील नामदेवांच्या शिष्यांची नावे विष्णुस्वामी, लध्धा खत्री, केसो कलंदर ही आहेत ज्यांनी वारकरी भक्ती परंपरा पुढे चालवली. नामदेवरायांची समाधी पंढरीस आहे त्यांनी पंढरीस विठ्ठलाचरणी देह ठेवला ती समाधी नामदेवाची पायरी म्हणून ओळखली जाते. नामदेवराय देहत्याग करताना देवापशी म्हणजे त्या रुक्मिणीवरास फार सुंदर मागणे मागतात ते मागणे असे

***वैकुंठासी आम्हा नको धाडु हरी ।***
***वास दे पंढरी सर्वकाळ ।।.***

लेखाचा शेवट गुरुदेव रानडे यांच्या शब्दात करतो ते म्हणतात महाराष्ट्रीय संतांमध्ये आध्यात्मिक लोकशाही ( Spiritual Democracy ) जाणवते.

ही लेखन सेवा गुरुचरणी समर्पित करतो.

पुंडलिकवरदा हरि विठ्ठल
सद्गुरू ज्ञानेश्वर तुकाराम महाराज की जय
जय जय रघुवीर समर्थ.
।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

शब्दवाही : यो नं काटे नांदेड मराठवाडा

**संदर्भ ग्रंथ : ज्ञानदेव व नामदेव शं.दा.पेंडसे**
**संत नामदेव हे वि इनामदार.**
**श्री नामदेवदर्श बृहत् दर्शन**
**श्रीनामदेव चरित्र , कार्य व काव्य विशेषांक**

योगेश काटे

# पारंपरिक खाद्यपदार्थांचा अमूल्य ठेवा



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**थकून भागून घरी आल्यावर हातात गरमागरम चहा आणि सोबत खमंग पदार्थ मिळाला तर तो क्षण म्हणजे स्वर्गसुखच नाही का ! निरोगी आणि सुद्दढ आरोग्यासाठी, शारीरिक शक्ती मिळवण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. आपण सगळेच जी मेहनत करतो ती त्या अन्नासाठी. घरातील गृहिणी ही काळजीने विविध पदार्थ बनवून आपल्या कुटुंबीयांना खाऊ घालते. आपल्या घरातील व्यक्तींच्या खाण्याच्या आवडीनिवडी जपत असताना त्यांना सकस आणि पोषक अन्न कसे देता येतील , या दृष्टिने स्त्री विचार करते. घरातील ज्येठांच्या तसेच लहान मुलांच्या स्वास्थ्यासाठी योग्य काय याचा सारासार विचार गृहिणी करत असते.**

घरातील पोळी- भाजी , वरण भात यासोबतच जिभेचे चोचले पुरवणारे पदार्थही घरात बनवून कुटुंबीयांना खुशीत ठेवत असते. प्रेमाचा मार्ग पोटातून जातो, म्हणतात ते काही खोटे नाही

हल्लीच्या पिढीला सगळं इंस्टंट लागतं. तरुण पिढी फास्ट फूड, चायनिज, पंजाबी, थाय, कॉन्टिनेंटल, इटालियन खाद्यसंस्कृतीकडे आकर्षित होताना दिसतात. आपल्या घरातील पारंपरिक खाद्यपदार्थ, न्याहारीचे पदार्थ पुढील पिढीला माहित असावेत, यासाठी ते पदार्थ घरात बनवले गेले पाहिजेत. खाद्यसंस्कृती ही आपआपल्या ठिकाणची संस्कृतीची , प्रदेशाची ओळख असते. आपले पारंपरिक पदार्थ जपण्यासाठी पिढ्यानपिढ्या ती परंपरा जपली गेली. आधीच्या पीढ़ीने ती जपली म्हणून ती आपल्यापर्यंत पोहचली. गृहिणी जेव्हा एखादा पदार्थ बनवते तेव्हा त्यात तिच्या भावना, प्रेम सर्व ओतत असते, त्यामुळे घराच्या पदार्थांची चव ही निराळीच असते. हो ना !

आजवर अनेक पाककृतींच्या पुस्तकांनी गृहिणींना आणि नववधुंना मार्गदर्शन केले आहे. पण आता ज्या पुस्तकाविषयी आपण जाणून घेणार आहोत, ते फक्त पाककृतीचं पुस्तक नाही तर आजी आणि नातवंड यांच्यातील निरागस , प्रेमळ नात्याचं प्रतिबिंब असणारे तसेच एक प्रेमळ, समंजस, कर्तव्यनिष्ठ आई, आजी या भूमिका निभावणाऱ्या अस्सल गृहिणीचं थोडक्यात जीवनपटच अनुभवता येणारे पुस्तक म्हणजे लेखिका मंदाकिनी रघुनाथ तांबवेकर लिखित 'आज्जी भूक लागली ! '

'आज्जी भूक लागली ! ' हे पुस्तक अर्थात पाककृतींचं असून हे पुस्तक लेखिकेची नात संध्या रेणुकांबा यांनी संपादित केले आहे. आपल्या आजीच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त तिला आदरांजली म्हणून आजीने लिहिलेल्या पाककृतींचं पुस्तक करावे आणि तिच्या आठवणी जपाव्यात या हेतुने संध्या रेणुकांबा आणि त्यांच्या कुटुंबीयांनी आजीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. आपल्या नातीच्या लग्नानिमित्त भेट म्हणून मंदाकिनी तांबवेकर यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात पाककृती लिहून दिल्या. त्याच पाककृतींचा समावेश पुस्तकात केलेला आहे.

आजीसाठी नातवंडं म्हणजे दुधावरची साय असते. आपल्या नातवंडांचे सगळे हट्ट आजी पुरवत असते. छान छान पदार्थ करून खायला देते आणि ती आजीसुद्धा वयोमान विसरून विविध पदार्थ शिकते.संध्या यांच्या आई- वडिलांच्या कामाच्या व्यस्त वेळापत्रकामुळे संध्या आणि त्यांची भावंडं आजीच्या सहवासात राहिल्या. शाळेतून घरी आल्यावर आजीला भूक लागली आहे, असे सांगितल्यावर आजी खमंग पदार्थ करून खाऊ घालायची. या आठवणी मनात किती रुंजी घालतात , हे पुस्तकाच्या सुरुवातीला असलेल्या मनोगतातून समजते. हे प्रसंग वाचताना प्रत्येकाला आपली आजी आठवत असेल !

या पुस्तकात विविध खाद्यपदार्थांच्या पाककृती समाविष्ट केलेल्या आहेत. सूटसुटीत वाक्यरचना, सोपी भाषा आणि पदार्थ बनवण्याची सोपी आणि पारंपरिक पद्धती , आटोपशीर लेखन यामुळे पुस्तक वाचताना किंवा समजून घेताना किंचितही गोंधळ होत नाही. विविध प्रकारच्या भाज्या, आमट्या, लोणची, गोड पदार्थ, पराठे, चटण्या, पूरी, उसळी, लाडू, खीर ह्या आणि आणखी भरपूर पदार्थांच्या पाककृती यात दिलेल्या आहेत. २०२ पाककृती , फक्त अनुक्रमणिका पाहिली तरी कोणकोणत्या पाककृतींच्या नावांचा उल्लेख करावा, हेच कळेनासे होते.

पारंपरिक पदार्थांसोबतच बदलत्या काळानुसार आलेले नवनवीन पदार्थ, फास्ट फूड, स्नैक्स सुद्धा मंदाकिनी तांबवेकर सहजपणे बनवत असत. याची प्रचिती पुस्तक वाचताना येते. ब्रेड पिज़्ज़ा, सैंडविच, पावभाजी,ब्रेडरोल, डोसा, इडली , बिना ओवनचा रवा केक इत्यादी पदार्थ त्या काळी होटेलमध्येही सहसा मिळत नसत.ते नवे पदार्थ बनवण्यास त्या शिकल्या. काळासोबत जगण्याची आणि नवे बदल स्वीकारण्याची त्यांची मनोवृत्ती खरेच वाखाण्याजोगी आहे. यातील काही काही पदार्थ हल्ली वेळेअभावी बनवले जात नाहीत, कालबाह्य होऊ लागले आहेत, अशा पदार्थांच्या कृतीसुद्धा यात दिल्या आहेत, ही महत्त्वपूर्ण बाब आहे.पौष्टिक आणि सकस पदार्थांचा समावेश आपल्या जेवणात असायला हवा आणि आपले मराठमोमुळे पारंपरिक पदार्थांची परंपरा आपण जपायला हवी, हा मोलाचा संदेश देणारे हे पुस्तक आहे.

**आकर्षक मुखपृष्ठ, रंगीत छायाचित्रे, उत्तम पुस्तक बांधणी , रंगीत छपाई यामुळे पुस्तक आणखी आकर्षक झाले आहे.**

**( आज्जी भूक लागली ! / लेखिका मंदाकिनी तांबवेकर / संपादन : संध्या रेणुकांबा / प्रकाशक : उदवैली बुक्स / मूल्य : ६०० रुपये )**



# लोककलेतील ‘विठ्ठल’



भगवान राऊत
संपर्क क्र. 9822844080

आधुनिक केसरी

**अहमदनगर जिल्ह्याचे सुपूत्र दिवंगत लोकशाहीर विठ्ठल उमप यांचा 12वा स्मृतीदिन येत्या 26 नोव्हेंबर 2022 रोजी मृदगंध पुरस्कार वितरण व स्मृती संगीत सोहळ्याने संपन्न होत आहे. त्यानिमित्त लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या लोकरंग भूमीवरील कारकीर्दीला उजाळा देणारा हा श्रद्धांजलीपर लेख... अहमदनगर जिल्ह्याचे भूमीपुत्र व दिवंगत लोकशाहीर विठ्ठल उमप यांना आपल्यातून जावून एक तप पूर्ण झाले आहे. 12 वर्षांपूर्वी नागपूरमधील दिक्षाभूमिवर आयोजित ओंडकरी शाहिरी जलसा हा कार्यक्रम सादर करण्यापूर्वी स्टेजवरील डॉ. बाबासाहे ओंडकर व भगवान गौतमबुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर जयभीम व जयबुद्धचा नारा दिल्यानंतर त्यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आला होता व त्यातच त्यांचे निधन झाले होते.**

संयोजकांनी त्यांना तात्काळ नागपूरमधील रुग्णालयात उपाचारासाठी दाखल केले होते मात्र त्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली होती. सुमारे 50 वर्षे आपल्या कलेद्वारे त्यांनी रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले. लोकगीते, शाहीरी, आंबेडकरी जलसा, कवणे, लावणी, भारुड, वासुदेव, जागरण गोंधळ, भजन, गवळण, कव्वाली, सवाल-जवा असे अनेक लोककला प्रकार व लोकरंग भूमी, मराठी रंगभूमी, नाटक, मालिका, चित्रपट, स्टेज शो, आकाशवाणी, दूरदर्शनसह विविध वाहिन्यांवर त्यांनी आपली कला सादर केली.

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील चिकणी हे उमप कुटुंयिांचे मुळ गाव. मात्र त्यांचे कुटुं उदरनिर्वाहसाठी मुंबईतील नायगावच्या बी.डी. डी. चाळीत स्थलांतरित झाले होते. 15 जुलै 1931 रोजी त्यांचा जन्म झाला. घरची हालाकीची परिस्थिती आणि आईच्या सततच्या आजारपणामुळे त्यांना सहावीनंतर शाळा सोडावी लागली. आपल्या कुटुंबाला हातभार लागावा म्हणून सुरुवातीच्या काळात त्यांनी रस्त्यावर चने-फुटाणे विकण्याचे काम केले. त्या काळात नायगावच्या बी. डी. डी. चाळीत आंबेडकरी चळवळीच्या विचारांचे वारे जोरात वाहत होते. विठ्ठल उमप यांचे वडील व आत्या भेदीक गात असत. तर आजोबा हे लोकगीत गायक होते. त्यामुळे लोककलेचा वारसा त्यांना आपल्या कुटुंबाकडूनच मिळाला होता. नायगावच्या चाळीत राहत असताना, तिथल्या कामगार कल्याण केंद्राच्या व्यायाम शाळेत जाणे, वेगवेगळे खेळ खेळणे, आंबेडकरी चळवळीच्या प्रबोधनाच्या कार्यात सहभागी होत असत. नाशिकच्या भोयाची वडाळी येथील यादवराव निरभवणे हे त्यांचे लोककलावंत असणारे मामा होते. त्यांनी विठ्ठल उमप यांच्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले. लहानपणी उमप यांना त्यांनी एक बुलबुल तरंग हे वाद्य घेऊन दिले होते. त्या काळामध्ये शिमग्याच्या काळात लहान मुले व मुली घरोघरी गवळण आणि परिनृत्य करीत मागायला जात असत. त्यांचे हे नृत्य बसवण्याचे काम यादव मामा करीत असत. विठ्ठल उमप 60 वर्षांचे असताना त्यांच्या मामांनी त्यांना श्रीकृष्णाचा वेश चढवला आणि ते गवळणीतले कृष्ण झाले. हा त्यांचा लोकरंग भूमीवरील पहिला अविष्कार ठरला. लहानपणापासूनच त्यांच्यावर ओंडकरी विचारांचा पगडा होता. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर भिमराव कर्डक, शाहीर अमर शेख, गवाणकर यांसारख्या आंबेडकरी चळवळीत झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्या कलावंतांचा सहवास त्यांना लाभला. ही मंडळी कलापथकाच्या माध्यमातून आंबेडकरी शाहीरी जलसा, कव्वालीचा मुकाबला, सवाल-जवा असे प्रोधनपर कार्यक्रम करीत असत. विठ्ठल उमप देखील या कलापथकात सहभागी झाले आणि चळवळीची गाणी आंबेडकरी गीत, कव्वाली गाऊ लागले. थोड्याच कालावधीत ते गायनात तरबेज झाले. स्टेजवरच कव्वाली तयार करून गाण्यामध्ये विठ्ठल उमप यांचा हातखंडा होता. पुढे ते इंडियन नॅशनल थिएटर (आयएनटी) मध्ये दाखल झाले. पहाडी आवाजाची नैसर्गिक देणगी लाभल्यामुळे पुढे ते शाहिरी देखील करु लागले. शाहीर अण्णाभाऊ साठे, गवाणकर, अमर शेख आणि शाहीर आत्माराम पाटील यांच्या रचना ते सादर करीत असत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर आधारित माझी मैना गावावर राहिली, ही लावणी ते जोरकसपणे सादर करीत असत. एकीकडे छंद म्हणून गायन करीत असतानाच उदरनिर्वाहासाठी त्यांना कधी स्टँडवर हमालीचे काम करावे लागले तर कधी शिपायाचे काम करावे लागले. 1962 साली त्यांचे लग्न झाले. तत्पूर्वी त्यांना सेंट्रल टेलिग्राफमध्ये पोस्टमन म्हणून नोकरी मिळाली. सायकलवर फिरून तारा वाटण्याचे काम ते करत असत. सतत सायकलवर भटकंती करावी लागत असल्यामुळे त्यांच्या ओठावर सतत गाणी असत. गाणी म्हटल्यामुळे सायकल चालविण्याचा शीण हलका व्हायचा. म्हणून ते गाणी गात असत. पुढे सेंट्रल टेलिग्राफमध्ये झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील लोकगीत गायन स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. प्रसिद्ध गायक मन्नाडे यांच्या हस्ते त्यांना पारितोषिक मिळाले आणि म्न्नाडे यांनी विठ्ठल उमप यांच्या गायनाचे तोंडभरून कौतुक केले. या कार्यक्रमास सेंट्रल टेलिग्राफचे विभागप्रमुख गुप्तासाहे उपस्थित होते. त्यांनी विठ्ठल उमप यांना मुंबई आकाशवाणीवर गायनाची संधी मिळवून दिली. 1953 साली विठ्ठल उमप यांनी मुंबई आकाशवाणीवर प्रथमच गायन केले आणि त्यानंतर पुढे सलग 50 वर्षे आकाशवाणीच्या लोकसंगीत विभागात त्यांचे गायन सादर होत असे.

गायनाच्या पुढच्या टप्प्यात त्यांनी लोकगीते, शाहिरी, कव्वाली, भजन, भारुड, गवळण, वासुदेव, वाघ्यामुरळी, जागरण गोंधळ हे सर्व लोककलाप्रकार सादर केले आणि गायन क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला. 1962 मध्ये एच. एम. व्ही. कंपनीने संगीतकार मधुकर पाठक यांच्या संगीत संयोजनाखाली ‘आला नवा महाराष्ट्र’ ही ध्वनीमुद्रिका काढली होती. त्यात शाहीर विठ्ठल उमप यांनी संत तुकाराम महाराजांचे ‘फु ई फु’ हे भारुड सादर केले. या भारुडाने विठ्ठल उमप यांना महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहचवले. त्यांची लोकरंगभूमिवरील कला कारकीर्द खऱ्या अर्थाने बहरली. पुढे त्यांनी गायलेले ‘अहो बँडवाले, असा जगाचा चाले हा खेळ, माझा पापलेट नाय रे बारका, बाजीराव नाना तुंबडीभर देना, लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला’, अशी अनेक लोकगीते तुफान लोकप्रिय झाली होती. शाहिरीबरोबरच कवी, लेखक, गीतकार, संगीतकार, नाटककार आणि अभिनेता अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी सक्षमपणे सांभाळल्या आणि जपल्या सुद्धा. आली लहर केला कहर, घाबरायचं नाही, भिम गर्जना, पांढर, सर्जा राजा, डॉ. बाबासाहे आंबेडकर, तहान, बळीचं राज्य येऊ दे, आई नंबर वन, बघ हात दाखवून, एक होती वादी, ती हवी की मी, तोचि एक समर्थ, शेतकऱ्याची लेक, वादळ, येळकोट येळकोट जय मल्हार, कच्चा लिंबू, घासरे रामा, वनवा विझेल का, प्रतिकार इत्यादी मराठी चित्रपटांमधून पार्श्वगायन व अभिनय देखील केला. तांडा, भारत एक खोज, महापर्व, होळी, कोंडमारा, मृगाचा पाऊस, सागर की गोद में, प्रतिभा आणि प्रतिमा, ज्ञानदीप, लोकसंगीत, आमची माती आमची माणसं, गजरा इत्यादी दूरदर्शन मालिकामधूनही अभियन केला. त्याचबरोबर अबक, दुबक, तिबक, खंडोबाचा लगीन, मातीचं स्वप्न, अरे संसार संसार, मुजरा घ्या सरकार, गाढवाचं लग्न, दार उघड बये दार उघड, देव माणुस, जिंजीहून सुटका, हरहर महादेव, हैदोस, गुण्या गोविदांनं, बुद्धम शरणमं, विठु रखुमाई, जांभूळ आख्यान इत्यादी नाटकातून सशक्त भुमिका केल्या. जिंजीहून सुटका या नाटकात ते शाहिराची भुमिका साकारत होते. हे नाटक पाहण्यासाठी त्यांची बहीण आली होती. मात्र नाटक सुरू असतानाच बहिणीला त्यांना हृदय विकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. अशा परिस्थितही त्यांनी आपला नाट्यप्रयोग पूर्ण केला. यावरून त्यांचे आपल्या कलेवर किती प्रेम आणि निष्ठा होती, हे दिसून येते. अलिकडच्या काळात त्यांनी आहेर, पायगुण, अन्यायाचा प्रतिकार, सौभाग्य कंकण, जन्मठेप, टिंग्या, विहीर अशा चित्रपटांतून देखील भुमिका साकारल्या होत्या. त्यांचे उमाळा (गजल संग्रह), गीत पुष्पांजली (काव्यसंग्रह), माझी वाणी भिमा चरणी, माझा आई भिमाई, रंग शाहिरीचे (शाहिरी गिते), फु बाई फु (आत्मकथन) अशी विविध प्रकारची साहित्य निर्मिती करून साहित्य क्षेत्रात देखील चौफेर मुशाफिरी केली. मनोरंजनातून प्रोधन या उक्तीप्रमाणे त्यांनी आपल्या लोककलेद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कुष्ठरोग निर्मूलन, दारुंदी, अंधःश्रद्धा निर्मुलन, ग्रामस्वच्छता अभियान, हुंडाबंदी या शासकीय योजनांचे कार्यक्रम केले. आपला शेवटचा गीतसंग्रह त्यांनी डॉ. ाबासाहे ओंडकर यांना अर्पण केला. त्यात डॉ. बाबासाहे ओंडकर यांच्यावरील गीतरचना तसेच पोवाडा, लावणी, छक्कड, अभंग, गवळण, वासुदेव, पांगुळ अशा सर्व गीत प्रकारांचा समावेश आहे. 1983 साली आर्यलँडमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय लोकसंगीत महोत्सवात त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. महाराष्ट्राची लोककला सादर करून त्यांनी भारताला प्रथम क्रमांक मिळवून दिला होता. त्याद्दल त्यांचे अनेक ठिकाणी मानसन्मान झाले. त्यापैकी संगमनेर येथे नामदार ाळासाहे थोरात यांच्या पुढाकारातून त्यांचा सत्कार झाला होता. तसेच जामखेड येथील स्वातंत्र सेनानी भाई फुटाणे सेवा प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित श्री संत नामदेव पुरस्कार वितरण सोहळ्यात माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार झाला होता. ही त्यांची अहमदनगर जिल्ह्याने घेतलेली विशेष दखल होय. वयाच्या 7 व्या वर्षी गवळणीतील श्रीकृष्ण म्हणून लोकरंगभुमिवरील एक लोककलावंत म्हणून उभे राहिलेल्या विठ्ठल उमप यांनी सलग 5 दशके लोकरंगभूमीची सेवा केली. मनात कितीही खदखद असली तरी आपल्या चेहऱ्यावरचे हसू त्यांनी कधी ढळू दिले नाही. यश आणि लोकप्रियतेची नशा कधीच त्यांच्या डोक्यात गेली नाही. किंवा ते कधीही प्रसिद्धीच्या मागे धावले नाहीत. आपल्या लोककलेद्वारे त्यांनी महाराष्ट्राची लोकसंस्कृती आणि लोकरंगभुमी खऱ्या अर्थात समृद्ध आणि संपन्न केली. रसिक मायबापा तुला भेटावं । जाता जाता एवढंच सांगावं । गाता गाता मरण यावं । माझं गाणं मरणांनही ऐकावं। असं ते नेहमी म्हणत असत. त्यांच्या म्हणण्यानुसार 12 वर्षांपूर्वी नागपुरच्या दिक्षाभुमीवर अगदी असंच घडलं आणि आंबेडकरी जलसा कार्यक्रमाच्या स्टेजवरच त्यांचे देहावसान झाले आणि महाराष्ट्राच्या लोककलेतील विठ्ठलाचे निर्वाण झाले. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक नंदेश उमप, संदेश उमप आणि उदेश उमप या तीन भावंडांनी त्यांचा हा लोककलेचा वारसा पुढे सुरू ठेवला आहे. नंदेश उमप यांनी आपल्या वडिलांच्या नावाने लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर व फाउंडेशनची स्थापना करुन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यवरांना मृदगंध पुरस्कार व स्मृतीसंगीत सोहळ्याची परंपरा सुरु केली. येत्या 26 नोव्हेंबर रोजी मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरमध्ये लोकशाहीर विठ्ठल उमप मृदगंध पुरस्कार व स्मृतीसंगीत सोहळा संपन्न होत आहे.



# जगातील सर्व मोठ्या देशांनी मोदींच्या मार्गाचा अवलंब केला !



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**इंडोनेशियामध्ये सुरू असलेल्या जी -२० शिखर परिषदेत सर्व देश भारताच्या मार्गावर चालताना दिसले. जी२० घोषणेच्या मसुद्यावर चार दिवस गतिरोध होता, त्यानंतर भारताने एकमत निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना काय सांगितले होते, याचे प्रतिबिंब यात पाहायला मिळते. होय, युक्रेनच्या संकटाच्या वेळी काही आठवड्यांपूर्वी पंतप्रधान म्हणाले होते, 'आजचे युग युद्धाचे नाही'. जी-२० परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्या महायुद्धाचं उदाहरण दिलं. जगानं रशिया यूक्रेन यांच्यातील युद्धावर मार्ग राजनैतिक पद्धतीनं काढला पाहिजे.**

ज्यावेळी जगात दुसरं महायुद्ध सुरु होतं, जगातील विविध देश बेचिराख होत असताना त्यावेळच्या नेत्यांनी शांततेचा मार्ग स्वीकारला होता. आता आपली वेळ आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

जी- २०मसुद्यात त्याचा समावेश करण्यात आला आहे. बाली येथे जी-२० शिखर परिषदेत पोहोचलेले जगातील नेते पंतप्रधानांच्या शब्दांची पुनरावृत्ती करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

युक्रेन वाद सोडवण्यासाठी युद्धविराम आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गावर परत जाण्याचे आवाहनही पंतप्रधानांनी मंगळवारी केले.

जी-२० शिखर परिषदेत रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धावरून परिषदेच्या समारोपाच्या वेळी रशियावर टीका करण्याचा प्रस्ताव अमेरिका आणि त्याच्या मित्रपक्षांकडून मांडण्यात येणार होता; मात्र त्याला भारत, चीन, ब्राझिल, इंडोनेशिया आणि स्वतः रशिया या देशांनी विरोध केला. एका सत्रात ते म्हणाले की, हवामान बदल, कोविड-१९ महामारी आणि युक्रेनच्या संकटामुळे निर्माण झालेल्या जागतिक आव्हानांमुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. लवकरच भारताला G-20 चे अध्यक्षपद मिळणार आहे. बुद्ध आणि गांधींच्या भूमीवर जी-२० बैठक होईल तेव्हा आपण सर्वजण मिळून जगाला शांतीचा संदेश देऊ, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला.

खरं तर, बाली येथील नेत्यांच्या परिषदेसाठी तयार करण्यात आलेल्या घोषणेच्या मसुद्यावर वार्ताहर एकमत होऊ शकले नाहीत. अशा परिस्थितीत भारतीय शिष्टमंडळ पुढे आले आणि मागच्या दाराने ब्राझील, अर्जेंटिना, मेक्सिको, सौदी अरेबिया आणि सिंगापूर या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांशी चर्चा केली. जगातील विशाल अर्थव्यवस्थांसमोर गटबाजी राजकीय रणांगण बनू नये, हा भारताचा हेतू होता. खरे तर जी-७ सदस्य देशांना रशियाच्या आक्रमणावर विशेषतः युक्रेनवर पूर्ण लक्ष केंद्रित करायचे होते.

सूत्रांनी आमच्या सहयोगी वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले की प्रस्तावनेचे आता दोन भाग असतील, पहिला भाग भू-राजकीय परिस्थितीवर केंद्रित असेल आणि दुसरा आर्थिक समस्या आणि रशियन हल्ल्यामुळे उद्भवलेल्या संकटाशी संबंधित असेल. परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा यांनी




सांगितले की, G20 जाहीरनामा तयार करण्यात भारताने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

शेर्पा अमिताभ कांत यांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळाने युक्रेनवरील रशियाच्या हल्ल्याबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावाची भाषा जाहीरनाम्यात प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न केला. तसेच, धान्य आणि खतांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत UN-तुर्की कराराचे स्वागत करा. या वर्षाच्या सुरुवातीला समरकंदमध्ये मोदींनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना दिलेला संदेश जाहीरनाम्यात ठळकपणे नमूद करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. 'हे युग युद्धाचे नाही' या मोदींच्या विधानाची जगभर चर्चा झाली. जगातील अनेक दिग्गज नेत्यांनी पंतप्रधानांच्या या संदेशाचे कौतुक केले होते. विशेष म्हणजे, पंतप्रधान बोलण्यापूर्वी, युक्रेनवर हल्ला होऊनही भारत या मुद्द्यावर मौन बाळगून आहे आणि रशियन तेल खरेदी करत असल्याची जगभरात टीका झाली होती. त्यावर, भारताकडून युरोपच्या तुलनेत खूपच कमी तेल खरेदी करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

वार्षिक जी-२० शिखर परिषदेच्या सत्राला संबोधित करताना, मोदींनी जागतिक महामारी कोविड-१९ दरम्यान देशातील १.३ अब्ज नागरिकांची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारताच्या प्रयत्नांनादेखील अधोरेखित केले. रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर रशियन तेल आणि वायू विकत घेण्याच्या विरोधात पाश्चिमात्य देशांनी केलेल्या आवाहनादरम्यान पंतप्रधानांनी ऊर्जा पुरवठ्यावर कोणतेही निर्बंध न ठेवण्याचे आवाहन केले.

हवामानबदल, कोविड-१९ जागतिक महामारी आणि युक्रेनच्या संकटामुळे निर्माण झालेली जागतिक आव्हाने यांनी जग उद्ध्वस्त केले आहे. जागतिक पुरवठा साखळी खिळखिळी झाली आहे. आजचे खत संकट उद्या अन्न संकटात बदलू शकते, त्यामुळे जगाला त्यावर उपाय शोधावा लागेल, असेहीपंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## थंडीचे दिवस...!

आले थंडीचे दिवस, अंगाला गारठा झोंबे,
गारवारा चोहीकडे, हा सांज-सकाळी पांगे.

आईच्या जुन्या साडयांची , गोधडी ही उबदार,
पहाटे-पहाटे थंडी, ही जाणवते चिकार.

थंडीच्या दिवसामध्ये, ऊन हवेसे वाटते,
गुलाबी थंडी अंगाला, पुन्हा-पुन्हा झोंबते.

सकस आहार हेच, शरीराला मानवते,
थंडीच्या दिवसात, अंग बलवान होते.

थंडीच्या दिवसामध्ये, शेकोट्या ह्या पेटतात,
सोरजन हात-पाय, हे शेकूनी घेतात.

मऊमऊ स्वेटर हे, अंगी वाटे उबदार,
डोक्यावर छान दिसे , कानटोपी-मफलर.

दरवर्षी थंडी येते, पिकांना गारठा देते,
आणि मानवाला थंड, गारवा देऊनी जाते...!

अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.



## भाव भक्तीची झोळी




भाव भक्तीची झोळी देवा
तुझ्या गाभाऱ्यावर झूले
मानवंदना करूनी देवा
वाहतो तुला फुले
भाव भक्तीची झोळी देवा
तुझ्या गाभाऱ्यावर झूले
तुझ्या भक्तीविना
मन माझे रिकामे
तुझ्याविना जगणं देवा
वाटते अधूरे
भाव भक्तीची झोळी देवा
तुझ्या गाभाऱ्यावर झूले
मानवंदना करूनी देवा
वाहतो तुला फुले
चरा चरा मध्ये तुझे
स्वरूप वेगळे
भाव भक्ती झोळी देवा
तुझ्या गाभाऱ्यावर झुले
मानवंदना करूनी देवा
वाहतो तुला फुले
भक्तीचा अभिषेक
गातो गुणगान
भक्तांची भक्ती पाहून
मन तुझे भरुनीया आले
भाव भक्तीची झोळी देवा
तुझ्या गाभाऱ्यावर झूले
मानवंदना करूनी देवा
वाहतो तुला फुले

लक्ष्मण वाल्डे,कन्नड
मो.नं-8888606068

## वेडे फुलपाखरू

सहजच फुलपाखरू संध्याकाळी
घिरट्या घेत घरात आले
मी ही त्यासी बोले
फुलांचा तू परागकण घेई
घरात तुझा जीव
गुदमरून रे जाई..
फुलपाखरू बोले मजसी
फक्त तुज भेटण्यापायी मी
आलो गं बाई..
पण मी गुंतले माझ्या कामी
रात्रभर ते फुलपाखरू
माझ्या अंगणीच बाई..
त्या फुलपाखराचे
का ? कुणास ठाऊक
माझे कांही तरी नाते बाई
मी उठताच माझ्या मागे मागे येई
त्या फुलपाखराचा
आज माझ्या घरी मुक्काम बाई..
दिवस उगवला
भिरभिरत ते फुलपाखरू
परत मज जवळी आले
मज भेटण्यापाही...
मी ही त्यासी बोलु लागले
दारे खिडक्या उघडी करूनी
शेवंतीच्या फुलांवर
ते बसले जाऊनी..
एक रात्र ते फुलपाखरू
झाले माझ्या घरचा पाहुणा
माझीया मनासी चुटका लावूनी
भुरकन ते उडूनी गेले
दिवसभर त्याच्या आठवणीने
जीव मात्र वेडापिसा झाला.

@सौ.भाग्यश्री दायमा
जयसिंगपूर



## काकस्पर्श

म्हणता काकस्पर्श होतसे मुक्ती
मायाजाली
दुःखाचेही हासणे त्याला उत्तर
नाही
कसे कुणाचे काय फिटतसे
प्रारब्धाचे सर्व काही
दुःखालाही सुखावाचुन दुसरा
उपाय नाही

कष्ट म्हणा की सुटका होती त्या
मायाजाली
आनंदाने घोट घेतसे रिचवत
दुःखालाही

कशा प्रकारे कुण्या काळी ज्योत
ती मालवली
रामनामे घेता सकळही त्या मुक्ती
सुलभ झाली

कोण कुठले काय देणे राहिले
आता नाही
मी म्हणणारा तो हरएक मृत्यूपुढे
टिकला नाही

कशाकाळीचे दुःख आळवत
बसला कोणे काळी
विश्वास असता रामापायी
मृत्यूही पापक्षाळी

चितेवरच्या देहालाही चटके
आता कळले नाही
रामापुढे काय चाले कुणाचेही
कदाकाळी

- स्वरानंद

## मौन....

मौन तुझे
मौनच माझे
मौन प्रश्न
मौनच उत्तर
मौन वाद
मौनच संवाद
मौन प्रीति
मौनच बंध
मौन आस
मौनच श्वास
मौन शब्द
मौनच हाक
मौन साद
मौनच पडसाद
मौन विरह
मौनच प्रेम

बलराज संघई
9420025208





## म्हणीचा गोडवा

एका हाताने वाजत नाही टाळी
हमेशा गोटे पडती खोट्याच्या कपाळी
हिरा तो हिरा गार ती गार
शहाण्या माणसाला शब्दांचा मार

सुंभ जळते पण पीळ जळत नाही टाकीचे
घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही

चोर सोडून संन्याशाला फाशी
दोन्ही घरचा पाहुणा राहीला उपाशी

जावे त्यांच्या वंशा तेव्हाच कुठे कळे
आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन
डोळे

भाषेचा गोडवा वाढला म्हणीमुळे
जेव्हा पुस्तक वाचाल तेव्हाच कुठे कळे


- रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव जि. यवतमाळ
मो. 9011559106

## लोकशाही

ते सांगती अम्हाला मस्तीत
लोकशाही नाही अजून येथे,वस्तीत
लोकशाही.
गुंडे लबाड आता करतात
राजकारण आहे अता
तयांच्या,गस्तीत लोकशाही.
पैशापुढेच चाले,तोतेगिरी जयांची
त्या धूर्त भामट्यांच्या,दस्तीत
लोकशाही.
लपवून कृत्य खोटे,सत्तेतल्या
शुरांनी वाटून घेतली ही, किस्तीत
लोकशाही.
साधा विकास अपुला, राहून सज्ज
आताठेवू नका कदापी,सुस्तीत
लोकशाही.
रक्तात बंडखोरी, मिसळून घ्या
जराशी आणू बघा नव्याने,शिस्तीत
लोकशाही.

©® विशाल कन्हेरकर.
निंभा.जि.अमरावती
मो.9172298839

## मार्ग नाही बरा असुर विवाहाचा...



नको होऊ ताई तू आर्ची
नको घालू जीवन तुझे खर्ची
जरी परशा जीवनाचा सोबती
आई वडील सोडुन होईल ग फजिती..
जन्म घेतला तुचं लाडकी ग चिऊ..
होई आनंदी परिवारी थोरला भाऊ...
झुन झुन वाजती पैजन अंगणी...
दुःख विसरुनी बाबा नाचे आनंदानी...
जोजविली तळहाताचा पाळणा करुनी...
पाऊल टाकले तु पहिले आधारानी...
नको दुखाऊ तु त्यांना प्रेमा पाई..
जन्म झाला ही माता पित्याची पुण्याई...
नकळतं यौवन नियम सृष्टीचा
प्रेम खेळ का ठरवा तरुनाईचा...
सहाजिक मणी वर सौभाग्याचा
मार्ग नाही बरा असुर विवाहाचा...
आई बापाचे स्वप्न कन्यादानाचे
विरुनि जाते कोठे, संकट येते दुःखाचे
जगी तोड़ दाखण्या उरत नाही लाज
लेकी तुझ्या मुळे बापाची झुकते मान
जीवन तुझे असे कसे बदलते
आई बापा नयनी आसु सोडते ...
चुकते काय माय माऊलीचे..
धडे कमी पडते का संस्काराचे...
खरे प्रेम का कळले कुणा ?
अडकशी जाळ्यात नको ग गुन्हा...
शेवटीला गेले किती, काय त्यांच्या गती
शहानी हो बाळे लळीवाळे,नको प्रेमात भ्रष्ट मती...

संदिप नानासाहेब वाकडे
खेडा ता.कन्नड मो.9766992776

## खैर कोई ...



आजकाल आदमी आदमी से बाते करते
हि कहां हैं ? जिंदगी मोबाइल हो गई टंगते
टंगते खैर कोई शिकायत नहीं मोबाइलने ही
बताया आज जागतिक पुरुष दिन है

दोपहर होने आयी बैठा हूं कमरें की किसी
कोने में न कोई चहल न कोई पहल न
धामधुम मैं जीवन में आया जबसे
अपेक्षा के बोझ से लदा हरदम पिता के फटे
जूते से लेकर बहन की शादी के सपनों का
आधार हूँ मैं उम्मीदों का पहाड़ हूँ खैर कोई
शिकायत नहीं


भले ही साल भर काम लें बैलों से
पोलेवाले वो भी सम्मान पाता है
रास्तों से जरा कह दो अभी भटका नही हूं
मैं आज तो कुछ सम्मान करो
भले कुछ मिठा न खिलाओ दो मिठे शब्द
बोल दो मुश्किलें जरुर है मगर ठहरा नही हूं
मैं खैर कोई शिकायत नहीं

फिर साल भर सुनाना जली कटी चुप रहुंगा
कुछ शिकायत ना करुंगा लेकीन वादा
जरूर करुंगा दिल में छुपा के रखी है
लड़कपन कि चाहतें साथ चलता है
दुआओ का काफिला खैर कोई शिकायत
नहीं

कदमो को बांध न पाएंगी मुसीबत कि
जंजीरें मोहब्बत से जरा कह दो
अभी बदला नही हूं मैं क्या पुरुष शोषित
हैं ? खैर कोई शिकायत नहीं
किस्मत से जरा कह दो
अभी तनहा नही हूं मैं
दो मिठे शब्द बोल दो
आज अपना दिन है
जागतिक पुरुष दिन है

भिकुलाल परमार


## एकटा...



तसं पाहिलं तर
प्रत्येक जण एकटाच
असतो
गृहित धरतो प्रत्येक जण
प्रत्येकाला
भाऊ, बहीण, मित्र
ओळखीचा, पाहुणा
शेजारी, नातेवाईक
हा, तो, असे कितीतरी
पण, तसं पाहिलं तर
प्रत्येक जण एकटाच
असतो
खूप विश्वास असतो
घट्ट नाते असतात
अगदी आंधळे असतो
आपण
अती प्रेम करतो
सगळं सांगून टाकतो
आणि विश्वासच बसत
नाही
आणि वाटतं मग
तसं पाहिलं तर0प
प्रत्येक जण एकटाच
असतो
दिखावा असतो प्रेमाचा
मतलब असतो
ज्याचात्याचा
स्वार्थ असतो प्रत्येकाचा
कोणी नसतो कोणाचा
खरंच
तसं पाहिलं तर
प्रत्येक जण एकटाच
असतो

@ संजय काव्या

## माझी माय म्हणायची



माझी माय म्हणायची तुझ्या
वाडवंडीलानी राखून ठेवलय
रे बाळा पोटापुरतं वावर

विनाकारण वायफळ खर्च
नको रे जरा जपून पैका वापर
नको दाखवू
खिशाचा पावर

कष्ट करूनी घाम गाळूनी जिद्द
चिकाटीने कमवलय रे ते वावर
ठेवलाय तू त्या मुटक्यावर हात
पण या बळीराजालाही सावर

गेली आमची ती दिवस खुप
संघर्षमय होती राखित होता
बाप तुझा दिन रात वावर !!

माय लेकराला सांगित होती
कष्टमय जिवन आपलं रे बाळा
तू आता भुकेला आवर !!
जगाच्या पाठीवर नाव आपलं
जगाचा पोशिंदा म्हणून फक्त
कागदावरच छापलं

या जगाच्या पोशिंद्याचे हात
मात्र व्यापारी लोकांनी बुडकून
छाटलं
लावुन ऐनक डोळ्यावर हात
घालून मालात माती चाळीत
बसलं

देविदास सुर्यवंशी
8390629551
नरसी, जि. नांदेड

तुकारामनीती
भाग 34

# शांतीपरतें नाही सुख।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

संत ज्ञानदेव-नामदेवादी संतांनंतर साधारणतः अडीचशे वर्षांनी सोळाव्या शतकांत संत एकनाथ आणि सतराव्या शतकांत संत तूकोबांनी वारकरी सांप्रदायाची भजन-कीर्तन-अभंग परंपरा अखंड चालू ठेवली. सोळावे आणि सतरावे शतक म्हणजे मोठा खडतर काळ! कडेकोट वर्णव्यवस्था, कट्टर जातीयता, धर्माच्या नावाखाली अवडंबर माजवून सुरु असलेली सामान्य माणसांची लुट आणि परकीय शत्रूंचा धर्मांतरासाठी चाललेला स्थानिकांचा अमानुष छळ! लोकांना प्रलोभन दाखवून अन्यथा धाक दाखवून बळजबरीने धर्मांतर घडवून आणले जात असतांना महाराष्ट्राच्या मातीत शेकडो वर्षांची रुजलेली, स्वातंत्र्य-समता-बंधुतेचा अंतर्भाव असलेली वारकरी परंपरा तेवेत ठेवण्याचे महत्कार्य नाथांनी आणि तूकोबांनी मोठ्या जीकरीने केल्याच्या नोंदी महाराष्ट्राच्या इतिहासाने जपून ठेवल्या आहेत. संत एकनाथांचा संसार आणि परमार्थ सुरक्षित होता; कारण त्यांचे गुरु श्रीमंत आणि ते स्वतः ब्राह्मण कुलीन असल्यामुळे त्यांना धर्ममार्तंडांचा म्हणावा तेवढा प्रतिरोध सहन करावा लागला नाही.

दुसरीकडे तुकोबांचा काळ आणि वेळ अत्यंत खडतर! स्वतः वर्णव्यवस्थेचे शिकार असतांना सुद्धा म्हणजे 'शुद्रवंशी' जन्मलेले असतांना कवित्व करणे, भजन-कीर्तन करण्यासारखे क्रांतिकारी कामे त्यांनी केली. याचा परिणाम म्हणजे तुकोबांना दिवसाढवळ्या धर्ममार्तंडांचा अक्षरशः काठ्यांनी मार खावा लागला. आपल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडवून टाकाव्या लागल्या! एकीकडे अशी गळचेपी तर दुसरीकडे त्यांच्या संसारात अनंत संकटांनी अक्षरशः उच्छाद मांडला होता. दुष्काळ पडला, भोवताल लोकांचे हाल पाहून तुकोबांनी आपल्या वाट्याला आलेली कर्जखते इंद्रायणीत बुडवून टाकली, आई-वडील, पत्नी, मुलगा आणि सगळी गुरं-ढोरं मेली. तुकोबांच्या संसाराची अक्षरशः राखरांगोळी झाली! तुकोबाराय देशोधडीला लागले! आपल्या सारख्या एखाद्या सामान्य माणसाची अशी विमनस्क अवस्था झाली असती तर नक्कीच आपण गळफास लावून जीव दिला असता! परंतु 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता एवढे ॥' ओळी लिहिणारे तुकोबाराय डगमगणारी हस्ती नव्हते! अशाही परिस्थितीत त्यांनी आपल्या मनाचा तोल ढळू दिला नाही. आपले लक्ष विचलित होऊ दिले नाही. परमार्थ आणि घर संसारात सगळीकडे इंगळ आणि बाहेर समाजात सर्वत्र अशांतता आणि अराजक माजलेले असतांना सुद्धा तुकोबाराय

शांतीपरतें नाही सुख । येर अवघें ची दुःख ॥१॥
ह्मणउनी शांती धरा । उतराल पैल तीरा ॥धृ॥
खवळलिया कामक्रोधी । अंगी भरती आधिव्याधी ॥२॥
तुका ह्मणे त्रिविध ताप । जाती मग आपेंआप ॥३॥ (शा.अ.गाथा अ.क्र. ५८०)

असे त्रिकालाबाधित, सर्वांसुंदरवाङमय लोकाभिमुख करून सामान्य माणसांचे जीवन जगणे सुकर करण्याचा अहोरात्र प्रयत्न करत राहतात. इथेच त्यांचे कलशस्थान सिद्ध होते! त्यांची स्थितप्रज्ञ वृत्ती सामान्य माणसांचे डोळे दिपवून टाकते!

तेच वाङमय कालातीत ठरते ज्यामधून वैश्विक संवेदना प्रकट केल्या जातात. ज्ञानोबा-तुकोबांचे आणि अन्य महान सृजनांचे वाङमय हे त्या पैकीच एक. तुकोबांची गाथा म्हणजे सर्वच समस्यांवर रामबाण औषधच! या अगोदरही याचा मी अनेकवेळा माझ्या तुकाराम नीतीत उल्लेख केला आहे. भारतीय राज्य-शासनकर्त्यांना जशी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची राज्यघटना नित्य मार्गदर्शक ठरते, अगदी त्याच तोडीने तुकोबारायांचा गाथा म्हणजे वारकऱ्यांची नित्य पथदर्शी राज्यघटनाच! आपल्या जन्मापासून ते मरण्यापर्यंतची सगळी कलमे इथे तुकोबांनी आपल्या अनुभवसंपन्नतेतून लिहून ठेवली आहेत. त्यामुळेच तुकोबांचे हे अलौकिक अभंग-वाङमय त्रिकालाबाधित सत्याचे प्रयोग करतांना तमाम मानवांना जगण्याचा सर्वोच्च मंत्र देत आहे. यावेळी निवडलेला संत तुकोबांचा अभंग म्हणजे संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारा अप्रतिम आणि पहिले चरण सर्वांच्याच पाठांतरातील आहे. पहिले चरण हे एखाद्या संस्कृत मंत्रासारखे लोकांद्वारे सहजच उच्चारले जातांना पाहून तुकोबा हे सहजतेने लोकोबा म्हणजेच लोकांचे बाबा होऊन जातात! या अभंगात जगद्‌गुरू तुकोबाराय जीवनात सर्वात सुख हे केवळ शांती धारण करण्यात असून एरवी संपूर्ण विश्व दुःखमय आहे. त्यामुळे तमाम मानवांनी शांतीचे अनुसरण केल्यास आपला संसार सहजतेने सुखाचा होईल. शांतीच्या विरोधातील असणारे शांतीचे कट्टर शत्रू 'काम' आणि 'क्रोध म्हणजे राग' हे मानवाच्या जीवनाला अनेक आधी-व्याधींचा विळखा पडल्याशिवाय रहात



नाही. तेंव्हा आधी-व्याधीमुक्त होण्याचा महामंत्र म्हणजे माणसाने आपल्या दैनंदिन जीवनात शांती ला अनन्यसाधारण महत्व द्यायला हवे. आधी म्हणजे मानसिक रोग, नकारात्मक विचार-दृष्टीकोन म्हणजेच एकप्रकारचा मनोरुग्ण. व्याधी म्हणजे शरीरिक रोग, वाट-पित-कफ इत्यादी व्याधी. म्हणजे मानसिक आणि शारीरिक रोगांवर उत्तम औषध म्हणजे शांती. त्याशिवाय यावरील सर्वोत्तम उपाय म्हणजे जीवनात शांती प्रस्थापित केल्यास माणूस त्रिविध तापापासून कायमचा मुक्त राहू शकतो. त्रिविध तापाच्या अनुषंगाने तैतरीय उपनिषदांमध्ये तीनवेळा "शांतीःशांतीःशांतीः" असा निष्ठापूर्वक उच्चार केल्यास आधिभौतिक, आधिदैविक आणि अध्यात्मिक या तीन तापांचे शमन म्हणजे ते थांबू शकतात आणि माणूस खऱ्या अर्थाने शांत होऊ शकतो. तीन ताप म्हणजे देहिक म्हणजे शारीरिक व्याधी, भौतिक म्हणजे व्यावहारिक व्याधी आणि दैविक म्हणजे नशिबाने आलेल्या सर्वच व्याधींना शरीरातून आणि संसारातून कायमचे घालवून द्यायचे असेल तर मानवाने आपल्या जीवनात शांती धारण करून जीवन सुखी करावे.

इसविसनपूर्व पाचव्या शतकांत महाकारुनी भगवान गौतम बुद्धांनी संपूर्ण जगाला शांतीचा मुलभूत संदेश दिलेला संपूर्ण जगाला सर्वश्रुत आहे. संपूर्ण विश्व जर आनंदाने मोहरायचे असेल तर जगाला शांती शिवाय पर्याय नाही. जगाच्या इतिहासाची पाने उलटून पाहिल्यावर मानवी संहाराने रक्तबंबाळ झालेली हजारो प्रसंग दिसतील ज्यामध्ये लाखो निरपराध लोकांना आपले अनमोल असे जीवन गमवावे लागले आहे. हिटलर असो, झार असो की आणखी एखादा हुकुमशहा असो, त्याने हजारो निष्पाप लोकांचे बळी घेतले आणि त्याचा शेवट काय झाला? पहिले-दुसरे महायुद्ध, भारतीय स्वातंत्र्य संग्राम किंवा जगातील झालेल्या अन्य युद्ध असो, यात अनेक लोकांचा जीव गेला आणि शेवटी काहीच निष्पन्न झाले नाही. रामायण असो की महाभारत युद्ध असो, शेवटी शून्यच! या सगळ्याच प्रसंगांचे आज जर मानवाने बारकाईने सिंहावलोकन केले तर सहजतेने लक्षात येईल ते हे की जगावर राज्य करण्याची स्वप्ने पाहणारा हिटलर स्वतः अशांत होऊन स्वतःच डोक्यात गोळी मारून घेतो, झार गिलोटिन खाली दिला जातो. या नरसंहार करणाऱ्या हिंस्र राजे-हुकुमशहा माणसांची कुठेही, कुणीही जयंती अथवा पुण्यतिथी साजरी करत नाही. उलट ही सगळी माणसे मानवतेला कलंकच होती हे वारंवार बोलले जाते. आज युक्रेन-रशिया युद्ध सुरु असून या युद्धात हजारो निरपराध लोक मारले जात आहेत. लाखो रुपयांचे नुक्सन होत असून दोन्ही देशातील सामान्य माणसांचे आणि तरुणांचे जीवन जगणे अक्षरशः टांगणीला लागले आहे. जगाला कधीही युद्ध परवडले नाही आणि कधीही परवडणार नाही. संपूर्ण मानवजात जर गुण्यागोविंदाने या जगात नांदायची असेल तर जगात शांतीची प्रतिष्ठापना होणे अत्यावश्यक आहे.

युद्ध-अशांततेमुळे दुभंगलेल्या जगाबरोबरच मानवाने स्वतःच्या जीवनातील शांतीचे स्थान सुद्धा तकलादू करून टाकले आहे. माणसाने कशाची स्पर्धा करावी? काय कमवावे? किती कमवावे? काय खावे-प्यावे? काय बोलावे? हे सगळे मुलभूत प्रश्न विसरून गेला. माणूस पैसा आणि वस्तू गोळा करायच्या स्पर्धेत आपले मूळ कधी विसरला (?) हे त्यालाही कळले नाही. आज माणसांकडे सर्व सोयी-सुविधा अक्षरशः पायावर लोळण घेतांना दिसत आहेत, मात्र तो सुखी नाही. गाड्या-बंगले-नौकर-चाकर सगळं आहे. महागड्या गाद्या आहेत मात्र झोप नाही. ताटात पंचपक्वान्न आहेत मात्र खाता येत नाहीत. खाल्ले तर ते पाचात नाहीत. प्रत्येकाच्या घरी-दारी पंचतारांकित सोयी-सुविधा पाणी भरत आहेत मात्र सगळे सुखी नाहीत. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दुःखाची किनार झाकत नाही. याशिवाय माणसांना अनेक जीवघेण्या व्याधींनी घेरले आहे. जसे की उच्च रक्तदाब-मधुमेह आदि सारख्या भयंकर रोगांनी आज माणूस पुरता पोखरून टाकला आहे. या रोगांना कारण म्हणजे माणूस करत असलेली अनावश्यक चिंता! या सर्वच भयंकर आधीं-व्याधींवर उत्तम उपाय म्हणजे आजच्या अभंगातील तुकोबांचे पहिले चरण होय! मानवाने जीवनातील शांती भंग करून खूप मोठे संकट ओढवून घेतले आहे. अशांतताच सर्व रोग आणि दुःखाचे मूळ आहे! आज घराघरांतील संवाद ठप्प झाले आहेत. लोक काँक्रीटच्या सिमेंटसारखे टणक झाले आहेत. नात्यानात्यातील ओलावा आटत चालला आहे. मोबाईलवर हजारो मित्र असलेले लोक एकांतात चिंताग्रस्त बसलेले आहेत. ही अत्यंतखेदाची बाब आहे! तेंव्हा सर्वांना आनंदी आणि सुख-समाधानाचे जीवन व्यतीत करायचे असेल तर आपल्या जीवनात शांती प्रस्थापित करून "भवतु सब मंगलम" प्रमाणे सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत्॥ ही विश्व शांतीची प्रार्थना उच्चारून तमाम मानव जातीचे कल्याण चिंतून स्वतः आणि संपूर्ण विश्व सुखी, आनंदी व्हावे यासाठी संत तुकाराम महाराजांसोबत सदैव प्रार्थना करूयात! जय तुकोबाराय!

# धर्मांतरातील 'अतिरेकी'पणा थांबेल का?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

देशात सक्तीचे धर्मांतरामुळे राष्ट्रीय सुरक्षेला व नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावरही गदा येवू शकते.अशी भीती सर्वोच्च न्यायालयाने दि.१४ नोंव्हेबर एका याचिकेवर निकाल देतांना व्यक्त केली.हा अत्यंत गंभीर प्रश्न हाताळण्यासाठी प्राणाणिक प्रयत्न करण्याची गरज आहे,असेही स्पष्ट न्यायालयाने म्हंटले आहे व केंद्राला याबाबत प्रतिज्ञापत्र करण्याचे निर्देश दिले आहेत.केंद्रातील भाजपाचे सरकार धर्मांतराबाबत काय पाऊले उचलते? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्रअसल्याने ते कोणत्याही धर्माचे रक्षण करत नाही, किंवा धार्मिकदृष्ट्या कोणाच्याही जीवनाची,श्रध्देची तोडफोड करत नाही.मुळात धर्म आवडीचा आणि विश्वासाचा विषय आहे.भारतीय घटनेने प्रत्येकाला धर्म निवडण्याचे वैयक्तीक स्वातंत्र्य दिले आहे.घटनेत अनुच्छेद २५ व २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे.अनुच्छेद २५ नुसार धर्माचा प्रचार म्हणचे प्रसार किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्य असा आहे. राज्य घटनेचा मसुदा तयार करताना 'परिवर्तन' हा शब्द वापरला गेला होता.पण अल्पसंख्याकांच्या उपसमितीने एम.रूचन स्वामी यांनी केलेल्या शिफारशीचे पालन केले व 'परिवर्तन' ऐवजी 'प्रचार' शब्दाची निवड केली.घटनेत 'धर्म परिर्वतनाची'कोणतेही स्पष्ट तरतूद नाही.तरीही मुस्लिम समाजाचे नेते घटनेतील कलम २५ अंतर्भूत आहे, असे ठामपणे सांगत असतात.संसदेत १९५४ मध्ये 'धर्म परिवर्तन' नियमन आणि नोंदणी विधेयक आणले गेले होते,पण प्रचंड विरोधामुळे ते समंत होऊ शकले नाही.भारताचा इतिहात पहाता मुस्लिमराजांनी आक्रमण आणि तलवारी जोरावर लाखो हिंदूंचे धर्मांतंर केले गेले.यात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी इस्लाम धर्म स्विकारावा म्हणून त्यांचा छळ केला व हत्या केली,पण त्यांनी इस्लाम धर्म स्विकारला नाही. मोगल सम्राट औरंगजेबाने शीख सांप्रदायाचे नववे गुरू तेगबहाद्दूर' यांना 'जिवंत रहावयाचे असेल तर इस्लाम धर्म स्वीकारा' अशी धमकी दिली होती.पण गुरू तेगबहाद्दूर यांनी शीर कापून देईन' पण इस्लाम धर्म स्विकारणार नाही,असे बजावले.तेंव्हा ११ नोव्हेंबर १६७८ ला त्यांचा शिरच्छेद केला गेला.त्यांच्या हा त्यागाचा व बलिदान दिवस 'शहीद दिन' साजरा केला जातो.तसेच दहावे गुरू गोविंदसिंघजी यांचे दोन मुले झोरावरसिंग (वर ९ वर्षे) व फत्तेसिंग ( ७ वर्षे ) यांना जिवंत भिंतीत गाडले गेले,पण या दोन चिमुकल्यांनी इस्लाम धर्म कबूल केलाच नाही. ज्यांनी हिंदू धर्मासाठी बलिदान दिले.यापासून आपण काही शिकणार आहोत की नाही?भारतात महिलांचे अपहरण अत्याचार,बलात्कार केले गेले.त्यांना इस्लाम धर्म स्विकारण्यास भाग पाडले गेले.इतिहासकाळ ते स्वातंत्र्यानंतरही इस्लामीकरण करणे थांबलेले नाही. जम्मू -काश्मीरमध्ये दहशवादी कारवायातून हिंदूचे धर्मांतर करण्याच्या घटना घडल्या आहेत.

भारतात पहिली जनगणना १९५१ मध्ये शेवटची २०११ मध्ये झाली.प्यू रिचर्स सेंटरच्या पहाणीनुसार हिंदुंची संख्या ३० कोटीवरुन ९०.६० कोटी तर मुस्लिमांची संख्या ३ .५० कोटीवरून १७.२ कोटी तर ख्रिच्शनाची संख्या ५० लाखावरून २ कोटी ८० लाखावर गेलेली आहे. त्यानुसार २०११ मध्ये हिंदुच्या५.४० प्रमाण घटले तर मुस्लिमांचे ४.४० टक्यांनी व ख्रिश्चनाचे ०.३४ टक्यांनी वाढलेले आहे.देशात मुस्लिमांचा प्रजनदर इतर धर्मापेक्षा जास्त आहे.भारताची २०२२ मध्ये लोकसंख्या १४१.२ तर चीनची १४२.६ कोटी आहे. यावरून२०२३ मध्ये भारत लोकसंख्येत चीनलाही मागे टाकून पहिल्या क्रमांकावर जाईल, असे दिसतेय, देशातील लोकसंख्येच्या आजगराला नियंत्रणात आणण्याची खरी गरज आहे. भाजपा सरकारचा लोकसंख्या नियंत्रण कायदा दृष्टीने पाऊले टाकत असताना मुस्लिम नेते विरोध करत आहेत. तर दुसरीकडे भाजपा केवळ 'हिंदु व मुस्लिम' असे राजकारण करत आहे,असा आरोप काँग्रेस इतर पक्ष या कायद्याला विरोध करत आहेत.देशात धर्मांतरांच्या दोन पध्दती आहेत,यात एक कायदेशीर व दुसरी धार्मिक प्रक्रियेव्दारे केले जाते.यात धर्म बदलण्यासाठी शंभर रूपायाच्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागते.त्यात बदलेलला धर्म,नाव,दोन पासपोर्ट फोटो आणि पत्ता तसेच ओळखीचा पुरावा द्यावा लागतो.हे सर्व वकील करून देतात. नंतर राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून राजपत्रात नोंद करावी लागते.यासाठी साठ दिवसाचा कलावधी लागतो.यासाठी तीन हजार रु. खर्च येतो.हिंदूत धार्मिकरित्या प्रत्येक मंदिरात सुविधा नाहीत, असे पुजारी सांगतात.पण विश्व हिंदू परिषद,आणि आर्य समाजातर्फे मंदिरात एक पूजा पध्दत आहे.त्यानंतर ती



व्यक्ती हिंदू धर्मात येवू शकते. इस्लाम धर्मात मस्जिदीत इस्लाम धर्म स्विकारण्याची इच्छा असल्यास 'कलमा' वाचवा लागतो.मौलवी त्या व्यक्तीला 'नमाज' व 'अजान' ची माहिती देतो. खिश्चन धर्मात चर्चमध्ये फादर त्या व्यक्तीला धर्माची माहिती देऊन त्याप्रमाणे आचारण करण्यास सांगितले जाते.इतर धर्मातील पध्दती वेगळ्या आहेत.धर्म संस्कार, ती पूजा पध्दती आहे.पण इस्लाम धर्माची बहुसंख्य झाली की,देशावर आपल्या धर्माचे राज्य येवू शकेल,या लालसेपायी धर्मांतर घडविले जात आहे.देशात केवळ इस्लाम व ख्रिश्चन या टोळक्यांकडून आमिष अथवा सक्तीने हिंदूचे धर्मांतर केले जात आहे. यात इस्माम,ख्रिश्चन धर्माचा मुळीच विरोध नाही. पण धर्मांतरासाठी ज्या छूपे कारस्थाने केली जात आहेत,अशा कृतीचे समर्थन करणाऱ्यांचा विरोध आहे.आज देशात धर्मांतरासाठी वेगवेगळे हातखंडे वापरले जात आहेत.यात गरीब हिंदू परिवारांना पैश्याचे आमिष अथवा हिंदूंना दहशद अथवा धमकी देऊन धर्मांतर केले जाते.हे प्रमाण वाढत चालले आहे. यात 'लव्ह जिहाद' तसेच 'लिव्ह इन रिलेशन'शीप माध्यमातून धर्मांतरच्या घटना घडत आहेत.हिंदु तरूणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढावयाचे व नंतर इस्लाम धर्म स्विकारण्यास मजबूर करावयाचे. प्रेम हे आंधळे असते,त्या धर्म व जात पाहिले जात नाही.तर मग मुस्लिम तरूण हिंदु तरूणींना धर्म परिवर्तनाची मागणी का करतात?कारण हिंदु तरूणींने इस्लाम कबूल केल्याशिवाय त्या विवाहाला इस्लाम धर्मात मान्यता नाही.हे प्रेमवेड्या हिंदु तरूणींना माहित नसावे! याची किती हिंदू तरुणींची हत्या झाली? यात मुस्लिम तरूणच का आहेत ? देव -देवतांचा अवमान करून भावना दुखविणे,धार्मिक दंगली घडविणे. अन्न -पदार्थात थूंकणे,उसाच्या रसात मास रक्त मिसळणे,ही कट्टर मानसिकतेचे लक्षण आहे.यातून हिंदू विरोधात व्देष पसविला जात आहे.हिंदू जागृत झाला आहे,तो विरोध करू लागला आहे.पण हिंदुंनी हल्ले झाले तरी त्यांनी शेपूट घालून घरात बसायवे?अशी अपेक्षा आहे काय?उलट हिच मंडळी इस्लाम खतरेमें है! असे म्हणत,अनेक नवीन कायद्यांना विरोध केला जात आहे. देशात व्देष कोण पसवितोय? हे काँग्रेसला माहित आहे!पण कळतय पण वळत नाही! ते मतांसाठी लाचार आहेत.ते मुस्लिमांच्या कट्टरतेबद्दल बोलणार नाहीत. मुस्लिमांना दुखावयाचे नाही,मात्र हिंदुंना लक्ष्य केले पाहिजे.हाच त्यांचा छूपा अजेंडा आहे.काँग्रेसची तुष्टीकरण नीती याला कारणीभूत नाही काय? देशातील धार्मिक ठेकेदारांनी धर्मातंराचा 'अतिरेकी'पणा चालू आहे.जगात भारत बहूसंख्य हिंदु आहेत.भारताचे इस्लामीकरण करण्याचे मनसुबे रचले जात आहेत. या धर्मांतरामुळे राष्ट्राच्या सुरक्षतेला व धार्मिक स्वातंत्र्यावर धोका निर्माण झाला आहे. हिंदु धर्मात सहिष्णुता आहे. केंद्रात भाजपाची सत्ता आल्यापासून जातीय -धार्मीय व्देष, धर्मांतर,खून बलात्कार सारख्या घटना घडत आहेत.याला राजकीय पक्ष खतपाणी घालत आहेत. राज्य घटनेतील समता,बंधूत्व, धर्मनिरपेक्ष हे तत्व टिकविणे हे,केवळ हिंदूनी नव्हे सर्व धर्मियांचे कर्तव्य आहे. तेंव्हा केंद्राने नवीन कायद्यात धर्मांतरांच्या कायद्यात सुधारणा करावी,तसेच दहशत,आमिष दाखविणे,सक्तीने धर्मांत्तर करणे हा गंभीर गुन्हा मानला जावा,त्यात कठोर शिक्षेची नवीन तरतूद करावी,तरच देशातील धर्मांतरातील 'अतिरेकी'पणा थांबेल.

# भारत जोडो यात्रेला महाराष्ट्रात प्रचंड जनसमर्थन

## नाना पटोले : भारत जोडो यात्रेने देशात परिवर्तन होण्यापासून आता कोणीही रोखू शकत नाही

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखालील कन्याकुमारीपासून निघालेल्या भारत जोडो यात्रेला महाराष्ट्रात लोकांचा मोठा पाठिंबा मिळाला. महाराष्ट्र हा काँग्रेस विचारधारेला माननारे राज्य आहे. या पदयात्रेमुळे जनतेमध्ये भाजपाने निर्माण केलेली भिती, द्वेष व दहशतीला चोख उत्तर देण्याचे बळ मिळाले आहे. भारत जोडो यात्रेला प्रचंड जनसमर्थन तर मिळालेच पण शेगावमध्ये अभूतपूर्व अशी विराट सभा झाली व राज्यातील जनतेने राहुलजींवर प्रेम व विश्वास व्यक्त केला. या पदयात्रेमुळे निर्माण झालेले काँग्रेसमय वितावरण राज्यभर कायम ठेवू, असा निर्धार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला. बुलढाणा जिल्ह्यातील जलंब येथील भारत जोडो यात्रेच्या कॅम्पमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना नाना पटोले म्हणाले की, भारत जोड़ो यात्रा आता जनआंदोलन झाले आहे आणि ही यात्रा आता कोणीही रोखू शकत नाही. या पदयात्रेने देशात परिवर्तन अटळ असल्याचे स्पष्ट झाले असून खोटे बोलून सत्तेत आलेल्या व नंतर जनतेची घोर फसवणूक करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे सरकार जनताच खाली खेचल्याशिवाय राहणार नाही. ही पदयात्रा विशाल होईल व जनतेचे मोठे समर्थन मिळेल असे मी दोन महिन्यापासून सांगत होतो तेव्हा विरोधक आमची खिल्ली उडवत होते पण देगलूरपासून बुलढाणा जिल्ह्यापर्यंत मिळालेले जनसमर्थन राहुलजी गांधी व काँग्रेसवरचा विश्वास दृढ करणारे ठरले आहे. आता देशात परिवर्तन होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. यावेळी बोलताना जयराम रमेश म्हणाले की, भारत जोडो यात्रेला महाराष्टातून मोठा प्रतिसाद मिळाला. शेगावची सभा ही भारत जोडो यात्रेवर



प्रेम व विश्वास दाखवणारी विशाल सभा झाली. सभेसाठीची २२ एकर जागा दुपारीच फुल्ल झाली होती. राहुलजी गांधी यांना ऐकण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने लोक या सभेसाठी आले होते. आजचा दिवस अत्यंत महत्वाचा आहे, स्व. इंदिराजी गांधी यांची जयंती आहे, त्यानिमित्ताने पदयात्रेत महिलांचा सहभाग मोठा होता. बंजारा समाजाच्या ७ ते ८ हजार महिला दुपारच्या सत्रात पदयात्रेत सहभागी होऊन नारीशक्तीचे प्रदर्शन घडवतील. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे आजच्या दिवशी मागील वर्षी मोदी सरकारला काळे कृषी कायदे रद्द करावे लागले. स्वतंत्र्य भारतात पहिल्यांदाच शेतकऱ्यांनी एवढे मोठे आंदोलन केले त्यात ७०० शेतकरी शहिद झाले अखेर मोदी सरकारला झुकावे लागले व ते काळे कायदे रद्द करावे लागले. हा शेतकऱ्यांचा मोठा विजय असून या निमित्ताने 'शेतकरी विजय दिवस' पाळला पाहिजे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या संदर्भात वारंवार विचारणी केली जाते की यावर उपाय काय? शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी जलसंधारणाची कामे या भागात मोठ्या प्रमाणात झाली पाहिजेत. शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला तर विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखल्या जाऊ शकतात.

या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या माध्यम विभागाच्या महिमा सिंह उपस्थित होत्या.



# आनंदनगरी म्हणजे विद्यार्थ्यांना उद्योगपती बनवण्याची कार्यशाळा : व्यंकट मैलापुरे

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** आनंद नगरीमुळे विद्यार्थ्यांना अगदी बारीक सारीक गोष्टीचे नियोजन करणे शिकता येते.जसे स्टॉलचे भाडे, खाऊ बनवण्यासाठी साधन सामग्री जमा करून त्या साधनसामग्रीचे चौकसपणे किंमत ठरवणे. कच्चामालाचे योग्य भाव करणे, तसेच बनवलेल्या पदार्थ विकण्यासाठी योग्य ती मार्केटिंग करणे तसेच जमा खर्चाचे ताळमेळ करणे व नफा ठरवणे या सर्व बाबीमुळे विद्यार्थ्यांचा कल व्यापारी व उद्योजक बनण्याकडे वळतो. त्यामुळे यातून एक प्रकारे विद्यार्थ्यांना व्यापारी उद्योगपती बनवण्यासाठी प्रेरणा दिली आहे, असे प्रतिपादन इपका कंपनीचे मानव संसाधन विभागाचे प्रमुख व्यंकट मैलापुरे यांनी केले. शहीद भगतसिंग हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका भारती साळुंखे या होत्या. प्रमुख पाहुणे दीपक बडे, शिवाजी बोडखे, संस्थेचे संचालक नानासाहेब हारकळ, अक्षय हरकळ आदींची उपस्थिती होती. यावेळी दीपक बडे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून पालकांनी सढळ हाताने या आनंद नगरीत खर्च करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवावे असे आवाहन केले.तर शिवाजीराव बोडखे यांनी या आनंदनगरीतून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा वाव मिळतो व त्यातून भविष्याचे व्यापारी निर्माण होतात असे सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संजय काळे यांनी केले.

# ठोंबरे कुटुंबाने सोडले मौन; म्हणाले विकास करायचा टीका नाही

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** राष्ट्रवादी कॉंग्रेस चे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील व विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या उपस्थित दि.16 नोव्हेंबर बुधवार 12 वाजेच्या सुमारास हा पक्ष प्रवेश पार पडला. मात्र औरंगाबाद च्या वैजापूर तालुक्याचे माजी आमदार भाऊसाहेब चिगटगावकर यांचा या पक्ष प्रवेशाला विरोध कायम आहे. त्यामुळं त्यांनी औरंगाबाद च्या वैजापूर येथे दोन दिवसापूर्वी पत्रकार परिषद आयोजित केली होती त्यावेळी भाऊसाहेब चिकटगांवकर यांनी ठोंबरे कुटुंबावर जोरदार टीका केली होती.. होती त्यामुळ कॉंग्रेस चे माजी जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब ठोंबरे व कॉंग्रेस चे युवक प्रदेश अध्यक्ष पंकज ठोंबरे यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी बोलतांना भाऊसाहेब ठोंबरे यांनी असे म्हटले माझ्या पुतण्याला राष्ट्रवादी मध्ये आण्यासाठी येथील स्थानिक कार्यकर्ते यांनी खास भूमिका बजावली आहे, आमदार सतीश चव्हाण यांची यात काहीही भूमिका नाही व चिकटगावकर यांनी केलेले आरोप किती खरे किती खोटे आहे हे तुम्हला माहीतच आहे. त्यावर मी जास्त बोलणार नाही. व आम्हला सर्वांना सोबत राहून विकासावर काम करायचे आहे. तर कॉंग्रेस युवक चे प्रदेश अध्यक्ष पंकज ठोंबरे यांनी आमदार चिगटगांवकर यांनी केलेल्या आरोपावर बोलताना म्हणाले कि मी त्यांच्या घरी जाण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या सहकार्यमार्फत भेटण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी माझ्याशी बोलण टाळले हेही मी पक्षाला सांगितले आणि अखेर राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मला अखेर पक्ष प्रवेश दिल असे पंकज ठोंबरे यावेळी बोलताना म्हणाले...

# भारतीय डाक विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा : मनोज वांगे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपुर येथे भारतीय डाक विभागातील कन्नड शाखेने भारतीय डाक विभागाच्या विविध योजना गावातील नागरीकांना समजवुन सांगीतल्या. या मध्ये सुमारे 18 ते 60 वर्षापर्यत असलेल्या नागरीकांनी 399 रुपयात अपघात विमा असणार आहे. त्यात अपघाती मृत्यु झाल्यास 10 लाख रुपयाचा विमा अपंगत्व आल्यास 10 लाखाचा विमा अपघात झाल्यास दवाखान्याचा खर्च शुकन्या योजना अश्या विविध योजनेचा लाभ घ्यावा असा भावणीक आवाहन साह्यक डाक अधिक्षक मनोज वांगे यांनी केले. यावेळी मनोज वांगे सहाय्यक डाक अधीक्षक, राहुल मुठाळ प्रबंधक बँक ऑफ महाराष्ट्र, अरविंद नागरे, संदीप खरे ,कृष्णा विरकर पोस्ट मास्तर रेल, आदेश खरात पोस्ट मास्तर आंबा, दीपक शिरसाठ, रवींद्र निकम व ग्रामस्थ यांची उपस्थिती होती .



# वृद्धेचा खून करुन दागिने लांबविणाऱ्या चोरांचा पर्दाफाश

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** बिडकीन येथील मंडाबाई पांडूरंग आघम, वय ५५ वर्ष रा. बिडकीन ता. पैठण यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०९/११/२०२२ रोजी मी घरी असताना सकाळी ०७:३० वाजेच्या सुमारास माझ्याकडे रिक्षा चालक आला व त्याने मला सांगितले की, तुमच्या बहिणीच्या घराला कुलूप लावलेले आहे. आम्हाला आज बाजारासाठी जाणे होते, परंतु त्या घरी नाही असे सांगितल्याने मी माझी बहिण जानकाबाई हरदास महालकर हिच्या घरी जावून पाहिले असता तिच्या घराला कुलूप लावलेले दिसले व तिच्या घरात जाण्यासाठी असलेला बाजुचा दरवाजा मला उघडा दिसला म्हणून मी घरात जाऊन पाहणी केली असता मला माझी बहिण झोपती त्या घरातील एक लोखंडी संदूक उघडी दिसली व त्यातील साड्या व कागदपत्रे अस्ताव्यस्त पडलेले दिसले म्हणुन मी माझ्या नातेवाईकांना फोन करुन नातेवाईकांना बोलावून घरात बहिणीचा शोध घेतला असता माझी बहिण ही पाठीमागील खोलीत पडलेली दिसली म्हणून जवळ जावुन पाहिले असता ती मयत झालेली दिसली तिच्या कानातील सोन्याचे कुडके दिसले नाही. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने माझ्या बहिणीच्या कानातील सोन्याचे कुडके चोरुन तिचा खुन केला. याप्रकरणी पोलीस ठाणे बिडकीन येथे गुन्हा दाखल झालेला आहे.

पोलीस अधीक्षक श्री. मनिष कलवानीया यांना सदर गुन्हयाची माहिती मिळताच त्यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळास भेट देऊन सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहता स्थानिक गुन्हे शाखेस सदर गुन्हयाचा समांतर तपास करणे बाबत आदेशीत केले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सदर गुन्हयाचा तपास करीत असताना सदरचा गुन्हा हा आरोपी नामे (१) राजु छबुराव साळवे वय ३६ वर्ष रा. कातपुर ता. पैठण जि. औरंगाबाद ह.मु. ग.नं. ०६ फुले नगर, उस्मानपुरा, औरंगाबाद (२) दिलीप गोविंद हिवाळे



वय ४५ वर्ष रा. जायकवाडी ता. पैठण ह.मु. नारेगांव, औरंगाबाद (३) शिवाजी सुखदेव खरात वय ३२ वर्ष रा. पिराची पिंपळवाडी ता. पैठण ह.मु. रमा नगर, चितेगांव ता. पैठण (४) देविदास उर्फ बाली सर्जेराव गलाटे वय ५१ वर्ष रा. चवा ता. पैठण ह.मु पांगरा रोड, चितेगांव ता. पैठण यांनी केल्याची माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता वरिल सर्व आरोपींनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अधिक माहिती घेतली असता नमुद आरोपींनी पोलीस ठाणे बिडकीन हधीत घरफोडीचा गुन्हा केल्याचे तसेच राजु छबुराव साळवे याच्याकडे असलेल्या मोटार सायकल बाबत विचारपुस केली असता त्याने सदर मोटार सायकल हि सुमारे तिन महिण्यांपुर्वी शिवाजी नगर मधील भारत नगर, औरंगाबाद येथुन चोरी केल्याचे व सुमारे तिन महिण्यांपुर्वी पोलीस ठाणे चिकलठाणा हधीतील चितेपिंपळगांव येथे एका वृद्ध महिलेला अडवुन गळयातील सोन्याचे दागिणे चोरी केल्याची कबुली दिली. नमुद आरोपींना सदर गुन्हयाचे पुढील तपासकामी पोलीस ठाणे बिडकीन यांच्या ताब्यात देण्यांत आले असुन पुढील तपास पोलीस ठाणे बिडकीन हे करीत आहे. सदरची कामगिरी. मनिष कलवानीया, पोलीस अधीक्षक, सुनिल लांजेवार, अपर पोलीस अधीक्षक, विशाल नेहूल, उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे, सपोनि रामचंद्र मुंजे, संतोष माने, प्रदीप तूबे, सुजाता गुंजाळ सफी सय्यद झिया यांनी केली आहे.

# वैजापुरात गायरानधारकांचे एकदिवसीय धरणे

## गायरान जमिनीवरील केलेले अतिक्रमण नियमित करा




आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** उपविभागीय कार्यालय वैजापूर याठिकाणी दिनांक 18 नोव्हेंबर रोजी गायरान धारकांचे एक दिवसीय आंदोलन संपन्न झाले. या आंदोलनाच्या माध्यमातून 1991 ते 1995 पासून गायरान जमिनीवरील केलेले अतिक्रमण नियमित करणे, तसेच पीक नुकसान व पीक विमा मंजूर करणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेत अतिक्रमण केलेल्या गायरान धारकांना मंजुरी देण्याची तरतूद करा. अश्या मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य भूमिहीन संघर्ष समितीचे अध्यक्ष संजय वाडगावकर यांच्या उपस्थितीत एकदिवसीय आंदोलन संपन्न झाले. याप्रसंगी गायरान धारकांनी अतिक्रमण केलेले गायरान नियमित करण्यात येऊन सवलती उपलब्ध करून देण्याच्या मागण्या केल्या. गायरान जमिनीवर उपजीविका सुरु असून यावर आमचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकास होत असेल्यांचे यावेळी त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** माझा एक दिवस माझ्या बळिराजासाठी या कार्यक्रमाअंतर्गत सोयगांव तालुक्यातील धनवट येथे जाऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी गावकारींना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या विविध समस्या जाऊन घेतल्या. शेतकरी वर्गाशी संवाद साधताना विवध पिकातील किड व रोग नियंत्रण, खतांचे व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, पिक विमा, वनराई बंधारे,महाडीबीटी योजनेची माहिती, शेतकरी गट माहिती,प्रधानमंत्री किसान सन्मान योजना तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आजच्या कार्यक्रमात पौष्टिक तृणधान्य वर्षनिमित्त राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानअंतर्गत ज्वारी पिकाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच यावेळी गावातील प्रगतिशील शेतकरी यांनी अडचणी मांडल्या यात प्रामुख्याने शेतकरी वर्गास दिवसा वीज मिळावी, तसेच सौर ऊर्जा प्रत्येकाला मिळावी आदी मागण्या मांडण्यात आल्या. आजच्या कार्यक्रमास प्रामुख्याने तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ, कृषि पर्यवेक्षक हेमंत देशमुख, अतुल पाटील, कृषि सहाय्यक आरती बावस्कर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच आजच्या कार्यक्रमांस गावाचे सरपंच, उपसरपंच,जि. प.सदस्य गोपीचंद जाधव,तंटामुक्ती अध्यक्ष अशोक पाटील, ग्रामपंचायत सदस्य उमरखा पठाण ,नाजीम पठाण तसेच गावातील प्रगतशील शेतकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बजाजनगर येथे राजपूत समाजाचा 'हम सब एक है'चा एल्गार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** येत्या डिसेंम्बर महिन्यात औरंगाबाद येथे सकल राजपूत समाजाचा भव्य मेळावा शासनाच्या वरिष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे,त्या अनुषंगाने शुक्रवार (त,१८)नोव्हेंबर रोजी या अनुषंगाने जाणीवजागृती अंतर्गत समाजातल्या तळागाळातिल घटकाने या मेळाव्यात उपस्थित राहावे यासाठी येथील रामलिला मैदानावर राजपूत समाजाची बैठक आयोजक आर.के.सिंह, प्रवीणसिंह राठोड, तसेच समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते तोताराम राठोड, कंवरसिंह बैनाडे, देवीचंद बारवाल, डॉ. जीवन राजपूत, महेंद्रसिंह ठाकूर, चांदा साहेब, धोंडीरामसिंह राजपूत, जगतसिंह परिहार यांच्या उपस्थितीत संपन्न झाली, बजाजनगर मध्ये बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान व विदर्भ, जळगाव, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर येथील हजारो राजपूत नौकरीला आहेत. या बैठकीत या सर्वांनी आपापसातील गटतट, हेवेदावे सोडून हा मेळावा यशस्वी करण्यासाठी व समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी "हम सब एम है"चा एल्गार देत एकीचे दर्शन घडविले,या मेळाव्यात एक लक्ष राजपूत/ परदेशी येतील अशी अपेक्षा आहे,गाओ गावी जाऊन मेळाव्या बाबत जागृती करण्यात येणार आहे, शासनाकडे समाजाच्या विविध मागण्या सादर करन्यात येणार आहेत, या विमुक्त जातीचे प्रमाण पत्र,वैधता प्रमाण पत्र, विना विलंब मिळावे,महाराणा प्रतापसिंह आर्थिक विकास मंडळ स्थापन करावे,शासकीय वसतिगृह राणा प्रताप सिंह यांच्या नावे काढण्यात यावे व राणा प्रताप सिंह यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी करून त्या दिवशी सुट्टी जाहीर करावी,असे श्री बहुरे यांनी विशद केले,कवरसिंह बैनांडे,देवीचंद बरवाल,धोंडीराम राजपूत,बचूसिंह राजपूत,यांनी समाजाच्या एकतेवर एकजुटीचे आवाहन केले,पदम राजपूत,चंदा राजपूत, विजयसिंह झाला,याची ही भाषणे झाली,हा मेळावा राजकीय मेळावा स्टेज नाही याचे भान सर्वांनी ठेवावे असेही नमूद करण्यात आले. मेळाव्यात ग्रामीण भागातील राजपूत समाजाच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने यावे आवाहन करण्यात आले.

# चोरी झालेली रक्कम मिळाली परत



आधुनिक केसरी न्यूज

**गोकुलसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील गोंदेगाव येथे दिनांक ७ ऑगस्ट २०२२ रोजी गोंदेगाव येथील किराणा व्यावसायिक अविनाश लक्ष्मण पाखले यांच्या राहत्या घरातील किराणा दुकानात चोरी झाली होती.पाखले यांनी बनोटी बिटला अर्ज केल्यानंतर तपासाची चक्र फिरवण्यात आली व विशाल राजेंद्र भोसले उर्फ बंटी यात दोषी आढळून आला. त्याकडून रोख रक्कम रुपये अठरा हजार दोनशे मुद्देमाल तपास अधिकारी राजू निवृत्ती बरडे यांनी जप्त केला. व सपोनि अनमोल केदार पोलीस स्टेशन सोयगाव येथे सुपूर्द केला आज दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी कार्यालयीन पूर्तता करून गोंदेगाव येथील व्यापारी अविनाश पाखले यांना अठरा हजार दोनशे रुपये ठाणे पोलीस सहाय्यक निरीक्षक अनमोल केदार यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली. यावेळी पोलीस कर्मचारी पाईकराव व तपास अधिकारी राजू निवृत्त बरडे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.व्यापारी अविनाश पाखले यांनी सोयगाव पोलीस स्टेशनचे व सर्वांचे याप्रसंगी आभार व्यक्त केले.





# अंबादास दानवेंची माऊली जन्मभूमीस भेट

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील संत ज्ञानेश्वरादी चारही भावंडाची जन्मभूमी असलेल्या आपेगावी सुरू असलेल्या माऊलीच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी शुक्रवारी रात्री भेट देऊन माऊलीचे दर्शन घेतले. याप्रसंगी अंबादास दानवे यानी उध्दव ठाकरे मुख्यमंत्री काळात पर्यटन खात्यातून आपेगावी निधी मंजूर केला होता परंतु आता तो शिंदे सरकारने स्थगित केला असला तरी पर्यटनाचा निधी मि पुन्हा अणुन आपेगाव तिर्थक्षेत्राचा विकास करु अशी ग्वाही दिली. यावेळी माऊली संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापुरकर, खरेदी विक्री संघाचे मजी चेअरमन प्रल्हाद औटे, शिवसेना तालुकाध्यक्ष मनोज पेरे, माजी प.स.सदस्य सोमनाथ जाधव, प्रध्यापक युवराज औटे, गणेश औटे, दिनेश पेंढारकरसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# एक लाख कृषिपंपांना डिसेंबरपर्यंत वीजजोडणी : संजय ताकसांडे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पैसे भरून प्रलंबित असलेल्या राज्यातील एक लाख कृषिपंपांना डिसेंबर २०२२ पर्यंत वीजजोडणी देण्याचा महावितरणचा निर्धार असल्याने त्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे निर्देश महावितरणचे संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी दिले. शुक्रवारी (१८ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित औरंगाबाद परिमंडल व अहमदनगर मंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.भुजंग खंदारे, अधीक्षक अभियंताप्रकाश जमधडे (औरंगाबाद शहर), प्रवीण दरोली (औरंगाबाद ग्रामीण), अर्शदखान पठाण (जालना), सुनील काकडे (अहमदनगर), मोहन काळोगे (स्थापत्य) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संचालक (संचालन) संजय ताकसांडे म्हणाले की, एक लाख कृषिपंपांना वीजजोडणी देण्याच्या उद्दिष्टानुसार महावितरणकडून नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ३० मीटर अंतरापर्यंतच्या प्रलंबित वीजजोडण्या येत्या २४ तासात देण्यात याव्यात. तसेच ३१ ते २०० मीटर अंतर असलेल्या प्रलंबित कृषिपंप वीजजोडणीसाठी उपलब्ध असलेल्या आकस्मिक निधीच्या कामाचे शंभर टक्के आदेश काढण्यात यावेत. कृषी आकस्मिक निधी कसा वाढविता येईल, त्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. तसेच २०१ मीटर ते ६०० मीटर अंतरातील प्रलंबित वीजजोडणीसाठी जिल्ह्यानुसार निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे वीजजोडणीच्या कामात हयगय करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा सुचक इशारा यावेळी त्यांनी दिला. महावितरण आर्थिक संक्रमणाच्या काळातून मार्गक्रमण करत असल्याने ग्राहकांना खात्रीशीर वीजपुरवठा करण्यासह वितरित केलेल्या वीजबिलाची वसुली करणे ही महावितरणची जबाबदारी आहे.

# विनापरवाना मद्यप्राशन; सात जणांना दंड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील एका हॉटेलमध्ये विनापरवाना दारू विक्री करून ग्राहकांना मद्य पिण्यास परवानगी दिल्याप्रकरणी हॉटेलचालकास तर परवाना नसताना मद्य प्राशन केल्याप्रकरणी ६ जणांना ठाणे उत्पादन न्यायालयाने दंड ठोठावला आहे. खुलताबाद पोलिस हद्दीतील बाजार सावंगी येथे राज्य शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी १० नोव्हेंबर रोजी हॉटेल सपना येथे छापा टाकला असता त्या ठिकाणी ६ जण विनापरवाना मद्य प्राशन करताना आढळले. तसेच हॉटेलचालक गणपत बाबूराव नलावडे यांनी हॉटेलमध्ये विनापरवाना मद्य ठेवले व ग्राहकांना मद्य पिण्यास परवानगी दिली. त्यामुळे ६ ग्राहक व हॉटेलचालक नलावडे अशा ७ जणांवर कारवाई करून गुन्हा दाखल केला. याबाबत १५ नोव्हेंबर रोजी खुलताबाद न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर न्यायालयाने हॉटेलचालक गणपत नलावडे याला २५ हजार रुपयांचा तर ६ ग्राहकांना प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड ठोठावला. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एन. एस. डहाके, दुय्यम निरीक्षक मधुकर उईके, प्रवीण पुरी, अशोक सपकाळ, अमित नवगिरे, सुरेश शिंदे, अमोल अन्नदाते यांच्या पथकाने केली. प्रथमवर्ग न्यायालय खुलताबाद येथे सरकारी पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता एस. ए. बनसोडे यांनी कामकाज पाहिले. अशी कारवाई सुरूच राहणार असल्याचे राज्य उत्पादक शुल्क विभागाने सांगितले आहे.





# स्व. बन्सीलाल संचेती यांच्या ५ व्या स्मृती दिनानिमित्त वैजापूर मर्चंट बँकेत अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील दि वैजापूर मर्चंट बँकेच्या शाखेत वैजापूर मर्चन्ट बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. बन्सीलाल रूपचंदजी संचेती यांच्या ५ व्या स्मृती दिनानिमित्त वैजापूर मर्चंट बँक,लासुर स्टेशन येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी संचालक मदनशेठ लोढा, विद्यमान संचालक प्रितमकुमारजी मुथा, लक्ष्मीनारायणजी धूत, उमेश अप्पा वाडकर, निकम अण्णा, मॅनेजर पोकर्णे, प्रा.शशिकांत सांगवीकर आदींसह बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# बनशेंद्रा येथे जागतिक शौचालय दिनानिमित्त स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील बनशेंद्रा येथे जागतिक शौचालय दिनानिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली यावेळी ग्रामविकास अधिकारी अविनाश कोकणी, सरपंच, उपसरपंच, व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत पाणीपुरवठा व सफाई कर्मचारी यानी भल्या सकाळीच गावातील ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटून देऊन स्वच्छता राखण्याचे आवाहन केले व स्वतः गावात स्वच्छता केली. सरपंच अबादास मोरे, उपसरपंच नितीन पाटील ढोले ग्रामविकास अधिकारी अविनाश कोकणी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत पाणीपुरवठा,सफाई कर्मचारी व इतर कर्मचारी यानी स्वतः सार्वजनिक शौचालय व ग्रामपंचायत कार्यलय परिसरातील असलेली अस्वच्छता स्वच्छ करून जागतिक शौचालय दिनानिमित्त स्वच्छता मोहीम यशस्वीपने राबवली.





# भारतीय कामगार सेना, मुंबई रुग्णालय युनिटतर्फे संचालक मंडळाची निवडणूक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बॉम्बे हॉस्पिटल को- ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीच्या सर्व संचालक संस्थेची समिती सदस्य पदासाठी पंचवार्षिक निवडणूक २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी दिनांक ०४/११/२०२२ रोजी घेण्यात आली. निवडणूक निर्णय संस्थेच्या एकूण सभासदांपैकी ३० सभासदानी उमेदवारी अर्ज दाखल केले त्यापैकी सर्व साधारण मतदार संघात १८ उमेदवार, महिला राखीव मतदार संघात ०६, अनुसूचित जाती जमाती मध्ये ०२ उमेदवर तसेच भटक्या विमुक्त जाती जमाती मतदार संघातून ०४ उमेदवार निवडणुकीसाठी उभे होते. निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले, बॉम्बे हॉस्पिटल व्यवस्थापन यांनी फार मोलाचे सहकार्य केले. रमेश भट्टड (एच आर डी डायरेक्टर) तसेच त्यांच्या सहकारी यांनी सर्व नियोजन व्यवस्थित केल्याने निवडणुक सुरळीत पार पडली. संस्थेचे व्यवस्थापक यांनी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे केली. भारतीय कामगार सेना, मुंबई रुग्णालय युनिट तर्फे जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले. बॉम्बे हॉस्पिटल को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या सर्व नवनियुक्त संचालकचे नावे पुढील प्रमाणे महेंद्र हरचंदे, सुनील चिकणे, विजय दळवी, अमृतलाल खुमान, रमेश कसबे, सरजू म्हात्रे, पल्लवी शिंदे, शिल्पा पवार, गणेश वरणकर, मंगेश गायकवाड व संतोष पाटील या सर्वांचा सत्कार शिवसेना जळगाव जिल्हा संपर्क प्रमुख संजय हरिश्चंद्र सावंत यांच्या विशेष उपस्थित शुक्रवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी ३:०० वाजता करण्यात आले होते. हा संपूर्ण सत्कार समारंभ युनिटचे अध्यक्ष राजू नायर यांच्या देखरेखीत पार पडले व सर्व विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in